दैनिक

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

जनप्रभात

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ मंगळवार, दि.१८ मार्च २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १५५ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

रेशनिंग तांदळामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी सुरू : राज्यमंत्री योगेश कदम

मुंबई : जालना जिल्ह्यातील माजलगाव येथून नागपूर येथे जाणारा ३० टन रेशनचा तांदूळ पोलिसांनी ट्रकसह जप्त केला. या जप्त मालासंदर्भात जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरु असून यातील दोषींवर कारवाई केली जाईल, असे राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. सदस्य विजय वडेट्टीवार यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. गृह राज्य मंत्री श्री. कदम म्हणाले, जिल्हाधिकारी जालना यांनी याबाबत संबंधितास कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्यांच्याकडे याबाबत सुनावणी सुरू आहे. रेशनिंग तांदळामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत पुरवठा उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून तीन महिन्यात समितीकडून अहवाल मागविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सर्वांसाठी अभिमानास्पद अन् प्रेरणादायी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भिवंडी तालुक्यातील शिवक्षेत्र मराडे पाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे (शक्तीपीठ) लोकार्पण

वृत्तसंस्था ■ मुंबई



ठाणे : देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, अशा सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भिवंडी तालुक्यातील शिवक्षेत्र मराडे पाडा, ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे (शक्तीपीठ) लोकार्पण झाले. यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळया मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले, शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजू चौधरी, श्री.विश्वनाथ पाटील, नरेंद्र पवार, जितेंद्र डाकी, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक (कोकण परिक्षेत्र) संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, श्री.अनंता भोईर, आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कैलास निचिते व राजू चौधरी यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मंदिराच्या संकल्पना व प्रत्यक्ष निर्माणाकरिता कौतुक केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आपल्या इष्ट देवतेचे मंदिरात जावून दर्शन घेवू शकतो. अतिशय सुंदर, भव्य दिव्य असे हे मंदिर निर्माण करण्यात आले आहे. या मंदिराला सुंदर तटबंदी आहे, अतिशय चांगले बुरुज आहे, दर्शनीय प्रवेश मार्ग, बगीचा आहे. या मंदिराच्या माध्यमातून महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक आणि पुढे संभाजी महाराजांची वाटचाल असे अतिशय सुरेख प्रसंग उभे करण्यात आले आहेत. यातून प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

आई जिजाऊंच्या संस्कारांनी अन् आशिर्वादाने शिवबा घडले. त्यांच्या प्रेरणादायी शिकवणीतूनच शिवरायांनी मुघलांच्या आव्हानांचा प्रतिकार केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या बलाढ्य फौजेविरुद्ध सर्वसामान्य जनतेतून शक्ती निर्माण केली आणि भगवा झेंडा फडकविला. छत्रपती शिवाजी महाराजांची ३०० वी जन्मशताब्दी साजरी होत असताना देश घडविण्याच्या कार्यात आपले योगदान देवू या, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य व केंद्र शासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा म्हणून नोंद होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संगमेश्वर येथे देखील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार असून त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. पानिपत येथील लढाई सर्वांना माहितच आहे. महादजी शिंदे यांनी गाजविलेला पराक्रम सर्वांना माहीत आहे. त्या ठिकाणीही भव्य स्मारक उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

लोकार्पण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शक्तीपिठाला तीर्थस्थळाचा दर्जा देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे भिवंडी-वाडा या रस्त्याचे कामही प्रगतीपथावर आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या शक्तीपिठाकडील येणाऱ्या सर्व मार्गांचे नियोजन उत्तमरित्या करावे, येथे येणाऱ्या शिवप्रेमींसाठी आवश्यक सोयीसुविधा तयार कराव्यात. याकरिता निधीची कमतरता पडणार नाही, असेही त्यांनी सांगितले. लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळया मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील व आमदार किसन कथोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १२ हजार २६२ कोटींचा निधी वितरीत : मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील

वृत्तसंस्था ■ मुंबई





मुंबई : राज्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. या नुकसान भरपाईसाठी यंदाच्या वर्षी आतापर्यंत १२ हजार २६२ कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच १३ हजार ३६१ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी आज विधानपरिषदेमध्ये दिली.

सदस्य परिणय फुके यांनी याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते. यावेळी विरोधीपक्ष नेते आंबादास दानवे, सदस्य प्रविण दरेकर, सदाभाऊ खोत यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, विभागाच्या शंभर दिवसांच्या नियोजनामध्ये नुकसान भरपाईची रक्कम १०० टक्के वितरीत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात अनेक शेतकऱ्यांची बँक खाती ही आधार संलग्न नाहीत, तसेच ई केवायसीही शिल्लक आहेत. यासर्व गोष्टी युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आधार संलग्न बँक खाती नसलेल्या शेतकऱ्यांची यादी, ई केवायसी नसलेल्या खात्यांची माहिती चावडीच्या ठिकाणी प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाईचे वितरणही तातडीने करण्यात येईल. कोणत्याही नुकसानग्रस्त शेतकऱ्याची भरपाईची रक्कम शिल्लक राहणार नाही, असेही मंत्री पाटील यांनी सभागृहात सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रीपेड ऑटो रिक्षासेवा १ जूनपासून सुरू करावी : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

नाशिक, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बस स्थानकांच्या कामकाजाचा आढावा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील टी-१ व टी -२ टर्मिनल येथे प्रीपेड ऑटो रिक्षासेवा १ जून २०२५ पासून सुरू करण्याचे निर्देश, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभाग व अदानी समूहाच्या प्रतिनिधींना दिले. विधानभवनात छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रीपेड रिक्षासेवा सुरू करण्याबाबत तसेच नाशिक, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बसस्थानकांच्या कामकाजाचा आढावा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला. यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, आमदार देवयानी फरांदे, माजी मंत्री गजानन किर्तीकर, परिवहन आयुक्त व एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी) विवेक भीमनवार, नाशिक व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एसटी महामंडळाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापन अदानी समूहाकडे असून अदानी समूह व परिवहन विभागाच्या समन्वयातून येत्या दोन महिन्यांत प्रिप्रेड रिक्षा सेवा सुरू करण्यासाठी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात. यामुळे प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि सुलभ प्रवासी सुविधा उपलब्ध होणार असल्याने विमानतळाचे व्यवस्थापन पहाणाऱ्या अदानी समुहाने परिवहन विभागाच्या सहकार्याने १ जून पासून प्रिप्रेड रिक्षा सेवा सुरू करण्यासंदर्भातील कार्यवाही करावी.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एसटी सेवा सक्षम करण्यासाठी लवकरच मिनी बसेस उपलब्ध करून देणार

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एसटी महामंडळाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. राणे म्हणाले की, सिंधुदुर्ग डोंगराळ, दुर्गम जिल्हा असून वाहतुकीसाठी एस टी बस हा एकमेव आधार आहे. त्यामुळे बस सेवा सुरळीतपणे चालू रहावी व प्रवाशांची गैरसोय टाळून त्यांना एसटी बसची सेवा मिळावी, यासाठी भविष्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी मिनी बसेस उपलब्ध करून देण्यात याव्यात. या मागणीला परिवहन मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शविला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बसस्थानक व बस गाड्यांच्या विविध अडचणीबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

पुढील एक महिन्यात नाशिकचे मेळा बसस्थानक समस्यामुक्त करावे

नाशिक शहरातील एसटी महामंडळाच्या समस्यां बाबतीत आमदार देवयानी फरांदे यांनी निवेदन सादर केले. प्रसाधनगृहे, बसस्थानक व परिसर स्वच्छता करुन नवीन बांधलेल्या मेळा बसस्थानक एक महिन्यांमध्ये समस्यामुक्त करावे असे निर्देश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले. आमदार फरांदे यांच्या मागणीनुसार महामार्ग बसस्थानकाचा विकास सिंहस्थ निधीतून करण्याबाबत शासनस्तरावर विचार करण्यात येईल. तसेच मेळा बसस्थानकाच्या समस्यांवरही सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, असेही परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उप-परिसरात १०० किलोवॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : ठाणे शहरातील मुंबई विद्यापीठाच्या धर्मवीर आनंद दिघे ठाणे उप - परिसरात 'पीएम-उषा' योजनेअंतर्गत १०० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासह, खेळाचे सुसज्ज मैदान, वर्षा संचयन प्रकल्प, अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंत आणि प्रवेशद्वाराचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. यापैकी १०० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे सौर पॅनल बसवण्याच्या अनुषंगाने फ्रेमिंग फॅब्रिकेशनचे काम पूर्ण झाले आहे. तसेच विविध अनुषंगिक कामे अंतिम टप्प्यात असून विविध स्तरावर चाचण्या घेतल्या जात आहेत. ठाणे उप - परिसर हे सौर उर्जेचा वापर करणारे विद्यापीठाचे पहिले उप-परिसर म्हणून ओळखले जाणार आहे. मुंबई विद्यापीठाने ४८ लाख रुपये खर्च करून ही सुविधा निर्माण केली आहे.

'विजेची वाढती मागणी आणि किंमतीमुळे मिळण्याच्या दृष्टिकोनातून आणि जीवाश्म इंधनावरील आपले अवलंबित्व कमी करण्यासाठी तसेच हरित संकुलाच्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाने हे महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. तसेच याच धर्तीवर कल्याण येथील स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड अप्लाईड सायन्सेस येथे हा प्रकल्प राबवला जात आहे. ठाणे उप - परिसराच्या बळकटीकरणाचाच भाग म्हणून सुसज्ज मैदान, पर्जन्य जलसंचयन, अंतर्गत रस्ते, संरक्षकभिंत आणि प्रवेशद्वाराचे बांधकामही लवकरच पूर्ण करण्यात येणार असून नजीकच्या काळात जिल्हा नियोजन समितीमार्फत संगणक, प्रिंटर्स, वर्ग खोल्यांमध्ये पब्लिक एड्रेस यंत्रणा आणि सीसी टीव्ही बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे', असे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

ठाणे उप-परिसरातील १०० किलोवॅट क्षमतेच्या या सौर ऊर्जा प्रकल्पामध्ये नेट मीटरिंग प्रणाली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून संपूर्ण उप- परिसराला हरित उर्जा मिळणार असून या प्रणालीतील नेट मीटर यंत्रणेसह सौर पॅनेल आणि इन्व्हर्टर समाविष्ट असल्याने अतिरिक्त उर्जाही विकसित करून त्याचे नियोजन केले जाणार आहे. विशेष बाब म्हणजे मासिक उर्जेच्या बिलात खूप मोठी बचत होणार असून उर्जेच्या सर्व गरजा पूर्ण करण्यास हे उप परिसर सक्षम बनणार आहे. साधारणपणे १०० किलोवॅट सोलर पॅनल प्रणालीचा उपयोग करून प्रतिवर्षी १ लाख ३० हजार युनिट वीज निर्मिती करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे ६० टन कोळसा आणि त्यापासून प्रतिवर्षी निर्माण होणाऱ्या १०६ कार्बनडायऑक्साईडपासून मुक्तता मिळणार आहे.

खासगी आस्थापनात विशाखा समिती स्थापन करणे बंधनकारक करणार : महिला व बालकल्याण मंत्री कु.आदिती तटकरे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये विशाखा समिती स्थापन करण्यात आली आहे. खासगी आस्थापनात विशाखा समिती स्थापन करणे बंधनकारक करून विविध स्तरांवर आढावा घेतला जाईल असे महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य चित्रा वाघ यांनी विशाखा समिती संबंधित उपस्थितीत केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या, राज्यातील काही खासगी आस्थापनात विशाखा समिती स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. या समित्या स्थापन करण्यासाठी विविध स्तरांवर आढावा घेतला जाईल.

विशाखा समिती स्थापन करण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. विशाखा समितीत येणाऱ्या तक्रारींचा निपटारा जलद गतीने करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

राज्य शासनाने महिलांच्या कार्यस्थळी सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलत विविध आस्थापनांमध्ये तक्रार समिती तसेच जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार समित्या स्थापन करण्याचे आदेश दिले असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

राज्यात सध्या ७४,०१० समित्या स्थापन झाल्या आहेत. तसेच, १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या ठिकाणी किंवा नियोक्त्याविरोधात तक्रारी असतील, अशा प्रकरणांसाठी जिल्हास्तरावर ३६ स्थानिक तक्रार समित्या कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला व बालविकास आयुक्तालय यांना यासंदर्भात राज्य समन्वय अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. जिल्हास्तरीय, महानगरपालिका, नगरपालिका आणि तालुका पातळीवरही नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

महिलांना ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून देखील तक्रार नोंदविता येईल असे तटकरे म्हणाल्या.

राज्य शासन वेळोवेळी बैठकांच्या माध्यमातून आणि परिपत्रकाद्वारे या समित्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करत आहे. त्यामुळे महिलांना त्यांच्या कार्यस्थळी सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळण्यासाठी योग्य पावले उचलली जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या लक्षवेधी सूचनाच्या चर्चेत सदस्य प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, मनिषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वंकष वाळू धोरण: महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

वृत्तसंस्था ■ मुंबई





मुंबई : वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलीस दलाकडून संयुक्त कारवाई करण्यात येते. परंतु राज्यात वाळू माफिया आणि वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वंकष वाळू धोरण तयार करणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली.


विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

राज्यात वाळू माफियांना आणि वाळू तस्करांना संरक्षण मिळणार नाही अशी ग्वाही देऊन मंत्री बावनकुळे म्हणाले की, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपसाबाबत ७ दिवसात चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करत असून यानुसार आता एम सॅन्ड म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशा प्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून सध्या वाळू पुरवठा आणि मागणीमध्ये असलेली तफावत दूर होणार आहे. त्यामुळे वाळू माफियांवर आपोआप नियंत्रण येईल. तसेच वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे समान अधिकार देण्याचाही वाळू धोरणामध्ये समावेश असणार आहे. वाळू धोरण तयार करताना लोकांच्या सूचनांचाही त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याशिवाय रत्नागिरी, रायगड जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या सक्शनपंपाच्या सहाय्याने वाळू उपशाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले.

तसेच सदस्य शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील खटाव येथील प्रकरणी विभागीय आयुक्तांमार्फत ७ दिवसात चौकशी करुन चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

सोयाबीन खरेदीसाठी केंद्राकडे मुदतवाढीची मागणी : पणन मंत्री जयकुमार रावल

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्य सरकारने मागील वर्षात देशात इतर राज्यांच्या तुलनेत ११.२१ लाख मेट्रिक टन इतकी सर्वाधिक खरेदी केली आहे. अजूनही सोयाबीन शिल्लक असल्याने केंद्र सरकारकडे मुदतवाढ मागितली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत दिली.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम ९३ अन्वये मांडलेल्या सूचनेवर उत्तर देताना पणन मंत्री श्री.रावल यांनी महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीची सद्यस्थिती मांडली.

पणन मंत्री श्री.रावल म्हणाले, राज्यात केंद्र सरकारच्या माध्यमातून ५६२ केंद्रांवर सोयाबीन खरेदी करण्यात आली. यासाठी राज्यभरात ७१० गोदामांची व्यवस्था करण्यात आली होती. आता सर्व गोदाम भरलेले असून सोयाबीन थेट वापरले जाणारे उत्पादन नसल्याने आणि प्रक्रिया केंद्रांची आवश्यकता असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. याचबरोबर तूर, कापूस आदी उत्पादनांची खरेदी सुद्धा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं.

हमी भावापेक्षा कमी दराने बाजारात सोयाबीन करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल. बाजारातील संतुलन राखणे गरजेचे असून हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने निर्णय घेताना विचारपूर्वक पावले उचलली जातील, असे श्री.रावल यांनी यावेळी सांगितले.

राज्यात विक्रमी उत्पादन झाल्यामुळे खरेदीसाठी अजूनही उपाययोजना आवश्यक असून, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी केंद्र सरकारकडे मुदतवाढीच्या मागणीद्वारे राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


संपादकीय...

आता हवा येऊ द्या..

सोमनाथ सूर्यवंशी, संतोष देशमुख जिवानिशी गेले तरी त्याबद्दलची चर्चा जातींच्या आधारेच झाली. जातीच्या या विळख्यातून राज्याची मुक्तता करायला प्राधान्य हवे. महाराष्ट्र सध्या खूपच तापलेला आहे. लोकसभा निवडणुकांपासून, खरे तर त्याहीआधी २०१४ साली, मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस आरूढ झाल्यापासून ही तापमानवाढ सुरू झाली. आधी न सुटणारा मराठा आरक्षणाचा मुद्दा निघाला आणि नंतर त्याचा गुंता अधिकच वाढवण्याचा प्रयत्न झाला. हा मुद्दा काढण्यामागे, आश्वासन देण्यामागे आणि अर्थातच तो प्रश्न न सुटण्यामागेही राजकारण हेच कारण होते. नंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपस कात्रजचा घाट दाखवल्यानंतर या तापमानवाढीचा वेग वाढला. याच काळात केंद्रीय यंत्रणांच्या डोळ्यांवर महाराष्ट्रातील विरोधी नेत्यांचा कथित भ्रष्टाचार येऊ लागला आणि इतका काळ केवळ सामाजिक कारणांनी होत असलेली तापमानवाढही राजकीय बनू लागली. हे राजकीय तापमान इतके वाढले की उद्धव ठाकरे यांचे साथीदार त्या उष्णतेने वितळू लागले आणि अखेर थंडाव्यासाठी भाजपच्या कळपात दाखल झाले. पाठोपाठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतही हेच घडले. अजितदादा आणि त्यांचे काही कंत्राटदारस्नेही सवंगडी केंद्रीय यंत्रणांच्या उष्णतेने पार पाघळले आणि तेही अखेर एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सवंगड्यांप्रमाणे भाजपशी हातमिळवणी करते झाले. या सत्तासंतुलनात राजकीय तापमान काही प्रमाणात कमी झाले खरे; पण हे वाढते तापमान मग सामाजिक क्षेत्रास तापवू लागले. हे सर्व केवळ उष्णता वाढण्यापुरतेच मर्यादित राहिले असते तर एकवेळ त्याकडे काणाडोळा करता आला असता. पण गेले काही महिने ही तापमानवाढ जीवघेणी ठरू लागली असून त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीवर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. अशा वेळी त्याची दखल घेऊन उपाय सुचवणे आवश्यक ठरते. विशेषतः मराठवाड्यातील एकट्या बीड जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत शेकडोंची हत्या झाल्याची माहिती विधानसभेत दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच दिली गेली असेल तर ही तापमानवाढ किती गंभीर आहे; हे लक्षात येईल. सध्या संतोष देशमुख प्रकरण गाजते आहे. या सरपंचाचे मरण, त्यास जबाबदार असलेले आरोपी अशा मुद्द्यांस जातीय वळण लागलेले आहे आणि त्यातून मराठा-ओबीसी दुभंग अधिक तीव्र झालेला आहे. त्याच परिसरात परभणीत सोमनाथ सूर्यवंशी याचाही जीव गेला. देशमुख हत्येस राजकीय कंगोरे असल्याने त्यावरील चर्चा आणि अखेर धनंजय मुंडे यांचा राजीनामा यामुळे हे प्रकरण प्रकाशझोतात राहिले. सूर्यवंशी याचा न्यायालयीन कोठडीत झालेला मृत्यू दुर्लक्षित राहिला. यातून एक प्रश्न उभा ठाकतो : मरणाऱ्याचे सामाजिक स्थान काय यावरून त्या मरणाऱ्याची दखल घेतली जाणार काय? कारण सूर्यवंशी मागास समाजाचा. म्हणजे त्या समाजाचा आक्रोश व्यवस्थेच्या कानी पडेपर्यंत त्याची दखल घेतली जाणार नाही, असा त्याचा अर्थ. 'बीडमधील अन्य हत्यांचा तपशील समोर आलेला नाही. त्यामुळे त्या गुन्ह्यांस जातीपातीची किनार होती किंवा काय, असल्यास मारले गेले ते कोणत्या जातीचे आणि मारणाऱ्यांची जात काय इत्यादी अलीकडच्या काळात अमूल्य ठरलेल्या मुद्द्यांची चर्चा अद्याप सुरू झालेली नाही. कदाचित ती होणारही नाही. कदाचित सूर्यवंशी याचे मरण ज्या कारणांनी दुर्लक्षित राहू दिले गेले ती वा तशीच काही कारणे यातील बहुतेकांच्या मृत्यूमागे असतीलही. किंवा त्या सर्व मरणांस राजकीय परिमाण नसेल. काहीही असो. पण या असल्या घटना आधुनिक इत्यादी महाराष्ट्रात कमालीच्या वेगाने वाढल्या असून राज्याने घेतलेले हे वळण अत्यंत धोकादायक ठरते. याचे कारण आजच्या महाराष्ट्रात जात या घटकास आलेले, दिले जात असलेले अतोनात महत्त्व. एखादा गुन्हा असो वा अन्य काही. पहिला प्रश्न उपस्थित केला जातो तो जातीचा. गुन्ह्यातील बळीची जात कोणती आणि आरोपी कोणत्या जातीचे याच्या चौकशा या आता सर्रास होतात. ही घृणास्पदता इतकीच मर्यादित नाही. या गुन्ह्यांवरील प्रतिक्रियाही जातीच्या परिघातच असतात. म्हणजे गुन्ह्यातील बळींचे जातभाई फक्त त्याबद्दल व्यक्त होणार आणि आरोपीचे समजातीय त्याबाबत व्यक्त होणार. हे व्यक्त होणेही न्याय्य असते वा माणुसकीच्या किमान तत्त्वांवर असते असे नाही. अनेकदा 'त्या जातवाल्याला धडा शिकवला हे बरे झाले' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त होतात आणि बळी हा अमुक-तमुक जातीचा असल्याने त्याच्यावर ही वेळ आली, अशी टिप्पणी सहजपणे केली जाते. हे कमालीचे दुर्दैवी आहे. हा मुद्दा केवळ गुन्हा/ आरोप इतपतच मर्यादित राहिलेला नाही. जगण्याच्या सर्व अंगास सद्यःस्थितीत जात या घटकाचा विखारी विळखा पडलेला असून त्यातून राज्याची मुक्तता करणे हे सर्वांचे प्राधान्य असायला हवे. कलाकार आणि त्याची अभिव्यक्ती, लेखक- प्रकाशक- वाचक- टीकाकार आदी सर्व मुद्द्यांचा विचार केवळ जातीच्या अंगाने होताना दिसतो. हे प्राक्तन आधुनिक कवींपुरते मर्यादित नाही. आपण महाराष्ट्राच्या उज्ज्वल संतपरंपरेस जातीच्या कोंदणात डांबणे सुरू केले त्यास बराच काळ लोटला. याच महाराष्ट्रात बाबासाहेब आंबेडकरांसारख्या अतुलनीय बुद्धिवंताने न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या बौद्धिक उंचीचा आदराने जाहीर गौरव केला आणि याच महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा पाया संतपरंपरेने घातला असे न्या. रानडे यांनी लिहिले. जे सहिष्णू वातावरण विसाव्या शतकात प्रत्यक्षात होते ते आज एकविसाव्या शतकात स्वप्नवत झालेले आहे. म्हणजे या काळात प्रगतीऐवजी आपली अधोगतीच झाली, असा त्याचा अथ. ''वरच्या' बाजूने धर्माचा दुभंग आणि येथे जातीचा, असे आपले वास्तव. परंतु त्यामुळे आपण आर्थिक प्रगतीत किती मार खात आहोत याचे भान आपणास नाही. तमिळनाडू सर्वार्थाने महाराष्ट्राच्या निम्मा. परंतु सकल राष्ट्रीय उत्पादन वा दरडोई कमाई या आघाडीवर तो आज महाराष्ट्राशी स्पर्धा करत असून तो आपल्या राज्यास कधीही मागे टाकेल अशी परिस्थिती आहे. आज दक्षिणेतील राज्ये ही अत्यंत स्पर्धात्मकता आणि कमालीची कार्यक्षमता, प्रशासकीय लवचीकता दाखवत असताना महाराष्ट्र मात्र जाती/ पातीची, भाषेची पोकळ अभिमानगीते गाण्यात धन्यता मानताना दिसतो. इतिहासाचा अभिमान जरूर असावा. राज्याचा इतिहास अभिमानास्पद निश्चितच. पण ऐतिहासिक अभिमान मिरवण्यासाठी वर्तमानही इतिहास घडवू शकेल अशा दर्जाचे हवे. त्या आघाडीवर बोंब असेल तर त्याकडे दुर्लक्ष व्हावे म्हणून मग केवळ ऐतिहासिक गौरवगाथांत रमणे बोकाळते. सध्याच्या महाराष्ट्रात तेच सुरू आहे. राज्याच्या सार्वत्रिक प्रगतीसाठी यात बदल व्हायला हवा असे या राज्याचे नेतृत्व करणाऱ्यांस वाटत असेल तर त्वरेने पावले उचलायला हवीत. ही जातीपातीची विषवल्ली दूर करणे लगेच शक्य नाही. पण निदान तिचा डंख कमी व्हावा यासाठी तरी हालचाल व्हायला हवी. त्यासाठी प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वपक्षीय, सर्वसमाजीय वा सर्वधर्मीय चर्चा करावी आणि काही एक मार्ग काढण्यासाठी पावले टाकावीत. अन्यथा हे असेच सुरू राहिले तर या राज्याचे काही खरे नाही, हे निश्चित. वसुंधरेचे तापमान वाढते आहे ते पृथ्वीभोवतीचा ओझोन थर पातळ झाल्यामुळे. त्याची जाडी पुन्हा वाढावी यासाठी आता प्रयत्न सुरू आहेत. ते आव्हान अवघड. महाराष्ट्र गरम झालेला आहे तो या राज्यास सुरक्षित ठेवणाऱ्या समंजसता आणि सहिष्णुता या गुणथरांची जाडी कमी झाली म्हणून. ती वाढवणे ओझोन थर पुन्हा जाड करण्याइतके अवघड नाही. त्यासाठी शहाणपणाचे वारे तेवढे पुन्हा एकदा या राज्यात वाहायला हवेत. डोकी शांत करण्यासाठी जरा हवा येऊ द्यायला हवी.

शहाजी राजे: पराक्रमी आणि युद्धप्रसंगी बुद्धिमान!

शहाजी राजे भोसले जयंती विशेष...



शहाजीराजे भोसले हे पराक्रम, युद्धप्रसंगीची बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन व स्वतंत्र राज्यकारभार या मूलभूत गुण-कौशल्य असलेले ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व होते. शहाजीराजांनी आदिलशाही तसेच निजामाकडे सुभेदार म्हणून मोठे पराक्रम केले. त्यांनी पुण्यासारख्या भागात मराठी जनतेला आपला पराक्रम तर दाखवला होताच पण त्याचबरोबर कर्नाटकातदेखील त्यांनी आपले कर्तृत्व गाजवले होते. उद्बोधक व ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या संकलित लेखात पाहुया... संपादक.

मालोजी भोसले यांची पत्नी दीपाबाई (उमाबाई) हिच्या पोटी वेरूळ इथे शहाजी राजे यांचा जन्म दि. १८ मार्च १५९४ रोजी झाला. शहाजींच्या जन्मतारखेबद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. काहींच्या मते मालोजी भोसले यांची मुख्य राणी उमा ही असून तिच्या पोटी शहाजी यांचा जन्म झाला, असे सांगितले जाते. बाबाजीराजे भोसले यांच्या घरात मालोजीराजे भोसले आणि उमाबाई भोसले यांच्या पोटी शहाजीराजे यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातोश्री उमाबाईंनी अहमदनगरजवळील शहाशरीफ पीराला अहमदनगर जवळील मुकुंदनगर भागात तारकपूर बस स्टँडपाशी नवस बोलल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली. पुढे सिंदखेडराजा येथील लखुजीराव जाधव यांच्या मुलीशी म्हणजेच जिजाबाईंशी शहाजीराजे यांचा डिसेंबर इ.स.१६०५मध्ये विवाह झाला. या वेळी लखुजीराव व मालोजीराजे हे दोघेही निजामशाहीत होते. पुढे लगेचच मालोजीराजांचा दुर्दैवी मृत्यू झाला. कालांतराने जसेजसे शहाजीराजे मोठे होत गेले, तसतशी पराक्रम, राजकारण, मुत्सद्देगिरी या बाबतीत त्यांची कीर्ती वाढत सर्वदूर पसरत गेली. अहमदनगर जवळच्या भातवडी येथे झालेल्या युद्धात शहाजीराजे यांनी प्रथम गनिमी काव्याचा वापर केला. जिथे मोघल सैन्य वस्तीला होते त्यावरील भागात असलेल्या धरणाची भिंत फोडून दहा हजार सैन्यानिशी दोन लाख सैन्याच्या पाडाव केला. दि. १६ सप्टेंबर १६३३ रोजी संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील भिमगडावर- शहागडावर लहानग्या मुर्तजा या निजमास मांडीवर घेऊन स्वतः सिंहासनाधिश्वर झाले व हे राज्य सलग तीन वर्षे चालवले म्हणजेच स्वराज्याचा संकल्प शाहागडवर घेतला. म्हणूनच शहागड हा किल्ला पुढे शहाजी महाराजांची स्वराज्य संकल्प भूमी म्हणून उदयास आली.

मालोजीराजे भोसले आपला भाऊ विठोजीराजे भोसले इ.स. १५७७मध्ये सहकुटुंब सिंदखेड येथे लाखुजीराजे जाधव यांच्याकडे नोकरीस आले होते. तद्नंतर शहाजींचे पिता मालोजीराजे यांनी लखुजीराजे जाधव यांची नोकरी सोडून इ.स. १५९९ साली अहमदनगरच्या निजामाची नोकरी मिळवली. मुघल शहेनशाह शहाजाहा याने इ.स. १६२४ लष्कर खानला १.२ लाखाचे सैन्यासह रवाना केले. सोबत आदिलशहा ८० हजाराचे सैन्य घेऊन निघाला. शहाजीराजांकडे २० हजाराचे सैन्य होते. त्यातील १० हजार अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवून १० हजार त्यांनी स्वतःकडे ठेवले. एवढ्या मोठ्या सैन्याला प्रचंड पाणी लागेल म्हणून मुघल आणि आदिलशाही सैन्याने उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या मेखरी नदीजवळ भातवडी येथे छावणी उभी केली.

एरवी दुष्काळी असलेल्या अहमदनगरला तेव्हा चांगला पाऊस झाला होता. शहाजीराजांनी छावणीच्या उत्तरेस धरणाला असे तडे पाडले, की रात्री झोपलेल्या मुघल आणि आदिलशाही छावणीला काही कळण्यापूर्वीच छावणीची वाताहात झाली. तेव्हा अनेक योद्धे शहाजीराजांचे बंदी झाले आणि शहाजीराजांचे नाव भारतवर्षात दुमदुमले. याच लढाईत शहाजीराजांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले. भातवडी हे गावं अहमदनगर पासून १५ किमी अंतरावर आहें.

शहाजीराजांनी आपले पुत्र छ.शिवाजी महाराजांना पुण्यात आपल्या जहागिरीवर स्वतंत्र कारभार चालविण्यासाठी पाठवून स्वराज्य स्थापनेसाठी बरीच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. शिवाजीराजांबरोबर दादोजी कोंडदेव, बाजी पासलकर, रघुनाथ बल्लाळ अत्रे, कान्होजी जेधे नाईक व सातारचे शिंदे देशमुख हेही पुण्यात आले. राज्यकारभारासाठी आवश्यक राजमुद्राही शहाजीराजांनीच शिवरायांना दिली.

छ.शिवाजींच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आणि शहाजीराजांची यांस फूस आहे या संशयाने आदिलशाहीने मुख्य वजीर नवाब मुस्तफाखान याने बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, बाजी पवार, बाळाजी हैबतराव, फतहखान, आझमखान यांच्या साहाय्याने शहाजीराजांना दगा देऊन कर्नाटकातील जिंजीजवळ कैद केले. साखळदंडांनी बांधून भर विजापुरातून शहाजीराजांना दरबारात हजर करण्यात आले. तो दिवस होता २५ जुलै १६४८चा. हे कळताच शिवाजी महाराजांनी मुत्सद्दीपणाने राजकारण करत दिल्लीत मोगल सुलतान शहाजहानला एक पत्र पाठवले. स्वतः आपण व आपले पिता शहाजीराजे हे दिल्लीपतीची चाकरी करू इच्छितात, असे त्यांनी लिहिले. याबदल्यात शहाजीराजांची विजापूरच्या कैदेतून मुक्तता करावी, ही अट घातली. अशा प्रकारे शिवाजी महाराजांनी शहाजीराजांच्या सुटकेसाठी दिल्लीच्या बादशहाला मधाचे बोट लावले होते, हा प्रयत्न यशस्वी ठरला. शहाजीराजांची दि. १६ मे १६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका झाली.

अफझलखान स्वराज्यावर चालून आला, तेव्हा अफझलखानाची दगाबाजी माहिती असल्याने शहाजीराजेंनी १७,००० फौज विजापूर बाहेर खडी ठेवली होती. शहाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की त्यांनी स्वाभिमान राखत आदिलशाही, मुघलशाही व निजामशाही- या सर्व सत्ताधीशांकडे काम केले. त्यांच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे टप्पे असे- इ.स. १६२५ ते इ.स. १६२८- आदिलशाही, इ.स. १६२८ ते इ.स. १६२९- निजामशाही, इ.स. १६३० ते इ.स. १६३३- मुघलशाही, इ.स. १६३३ ते इ.स. १६३६ - निजामशाही, इ.स. १६३६ ते इ.स. १६६४ - आदिलशाही, पुढे इ.स. १६६१-इ.स. १६६२ दरम्यान शहाजीराजे महाराष्ट्रात आले होते. त्यांनी त्यानंतरचा काही काळ शिवाजीराजे व जिजाबाईंसमवेत घालवला. आपण लावलेल्या स्वराज्याच्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाल्याचे पाहून ते धन्य झाले. काही काळानंतर ते पुन्हा आपल्या जहागिरीत परतले. माघ शुद्ध ५, म्हणजेच दि. २३ जानेवारी, इ.स. १६६४ रोजी होदेगिरीच्या जंगलात शिकारीला गेले असताना त्यांच्या घोड्याचा पाय एका वृक्षवेलीमध्ये अडकला, ते खाली कोसळले आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजांनी राजपरंपरेप्रमाणे शहाजीराजांची उत्तरक्रिया केली व समाधी शिमोग्याजवळ होदेगिरी जिल्हा दावणगिरी- कर्नाटक येथे बांधली.

!! जयंतीच्या पावन पर्वावर शहाजीराजांना कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

सुचारित्व...

जरी भांडणे घरामध्ये
लपवून ठेवावे शत्रुत्व
जाहीर मिठ्यामारून
सिध्दकरायचे मित्रत्व

पेडबातम्या पसराव्या
जगजाहीर सहिष्णुत्व
कॅमेरा सारखा सोबत
प्रदर्शन करे सुचारित्व

बालिशबोलणेविनोदी
दावते बुध्दीचे शिशुत्व
हसतमुख स्वभाव हा
भाट गातील ते गुणत्व

प्रलयजरी आला कुठे
कळत नसे अगाधित्व
वलये असावी भोवती
झाकून जाईअकृतित्व

चष्मेघालावे आकर्षक
दिसू नये जगा अंधत्व
कितीझाकावे अवगुण
नसा नसा भरे दभित्व

लपवूनठेवावा खंजीर
पेहरावा दिसो साधुत्व
व्याख्याने झोडा असे
वाणीत अत्यंत मधुत्व

लायकी नसे मुळीजरी
हवेचं सत्तेचे स्वामित्व
येन केन प्रकारेण भले
कायमसत्तेचे अस्तित्व

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

वगतृत्व..

जरी भांडणे
घरामध्ये
लपवून ठेवावे शत्रुत्व
जाहीर मिठ्यामारून
सिध्दकरायचे मित्रत्व

खुमखुमी ती युध्दाची
समशेरीत नसे जेतृत्व
सपाटून हारे कैकवेळे
आम्ही करणारं नेतृत्व

म्हातारपणा सोसवेना
कमी ना तरी लोलुत्व
पायात कंपने थरथरी
तरीही दाखवा प्रभुत्व

सभेत हवा मान प्रथम
बरळत राहते वक्तृत्व
नाटकीपणा रंध्रा रंध्रा
कमी ना होई वगतृत्व

भित्रेपणा कृती उक्तीत
उसळी मारते रे पुंस्त्व
पेलवेन झुळूक जराशी
गाजवू लागी पुरूषत्व

घेतला संन्यास बुध्दीने
केव्हाचं पावले पंचत्व
साधु बनूनि व्याख्यानी
सांगत राहतो पंच तत्व

कळेना बाळबोधभाषा
तत्वज्ञान सांगे निस्सत्व
बरळत रहावे निष्फळ
का निःसंदिग्ध निःसत्व

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

टोरेस गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेकडून आरोपपत्र

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : टोरेस गुंतवणूक गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी आठ आरोपींविरोधात सत्र न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. हे आरोपपत्र २७ हजार १४७ पानांचे आहे. याप्रकरणात आतापर्यंत १४ हजार १५७ गुंतणूकदार आर्थिक गुन्हे शाखेकडे आले असून त्यांची १४२ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मीरा-भाईंदर या भागांतील हजारो गुंतवणूकदारांचे याप्रकरणात कोट्यावधींची फसवणूक करून परदेशात पलायन केलेल्या नऊ आरोपींविरोधात पोलिसांनी ब्लू कॉर्नर नोटीस जारी केली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेने याप्रकरणी मे. प्लाटिनम हेर्न प्रा.लि., तानिया ऊर्फ टॅझगुल झॅस्टोव्हा, व्हेलेन्टिना गणेश कुमार, सर्वेश सुर्वे, अल्पेश खारा, तौसिफ रियाझ, अर्मेन ?टीयन व ल्लन सिंह या आठ आरोपींविरोधात विशेष एमपीआयडी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. २७ हजार १४७ पानांच्या आरोपपत्रात सर्व आरोपींचा सहभागाबाबतची माहिती देण्यात आली आहे.

३५ कोटींची मालमत्ता जप्त

आर्थिक गुन्हे शाखेने टोरेस प्रकरणात आतापर्यंत ३५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. तसेच टोरेस कंपनीशी संबंधित फर्निचर, विद्युत उपकरणे, सात ते आठ मोटरगाड्या यांचा लिलाव करण्याबाबत एमपीआयडी न्यायालयाकडे परवानगी मागण्यात आली आहे. तसेच टोरेसमधील आरोपींनी जयपूर येथील कंपनीतून मौल्यवान खडे खरेदी केले होते. त्या कंपनीने ते मोल्यवान खडे परत घेऊन पैसे देण्याची तयारी दर्शवली आहे.

सुमारे दीड कोटी रुपयांच्या मौल्यवान खड्यांची पुन्हा विक्री करण्याबाबतची परवानगीही पोलिसांनी न्यायालयाकडे मागितली होती. त्याशिवाय याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना सक्षम अधिकारी म्हणून नेमण्याच्या प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली आहे. त्यासाठीही परवानगी मागण्यात आली आहे. याप्रकरणी आतापर्यंत १४ हजार १५७ गुंतवणूकदारांची ११४२ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

महामुंबईत हजारो गुंतवणूदार

मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मीरा-भाईंदर या भागांतील हजारो गुंतवणूकदारांचे याप्रकरणात कोट्यावधींचे नुकसान झाले आहे. हा संपूर्ण कट युक्रेनमधील नागरिक असलेल्या मुख्य आरोपीने रचला होता. या प्रकरणात आरोपी असलेले युक्रेनमधील आठ नागरिक आणि तुर्कस्तानमधील एक नागरिक सध्या फरार आहेत.

पोलिसांनी संशयित सूत्रधार ओलेना स्टोइयान, व्हिक्टोरिया कोव्हालेन्को, मुस्तफा कराकोच, ओलेक्झांडर बोराविक, ओलेक्झांडर झापिचेंको, ओलेक्झांड्रा ब्रुंकील्स्का, ओलेक्झांड्रा त्रेडोखिब, आर्टेम ओलिफरचुक आणि इयुर्चेंको यांच्या विरोधात ब्लू कॉर्नर नोटिस जारी केली आहे. टोरेस प्रकरणातील मुख्य सूत्रधाराने गैरव्यवहारातील २०० कोटी रुपये परदेशात पाठवल्याचा संशय आहे. हा गैरव्यवहार उघड होण्यापूर्वी काही सतर्क नागरिक व गुंतणूकदारांनी पोलीस व इतर यंत्रणांना या प्रकरणाची ई-मेलद्वारे माहिती दिली होती.

ईडीकडूनही तपास

याप्रकरणी ईडीही तपास करीत आहे. त्यांनी याप्रकरणी जयपूर व मुंबईतील १३ ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात संशयीत कागदपत्रे, डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले आहेत. तसेच, मे. प्लाटीनम हेर्न प्रा. लि.(टोरेस ज्वेलरी) आणि त्याच्या सहयोगी संस्थांच्या नावावर असलेली बँक खाती गोठवण्यात आली आहेत. त्यात २१ कोटी ७५ लाख रुपये असल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणी शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (५), ३१७(२), ३१७(४), ३१७(५), ३१५ (५) व महाराष्ट्र महाराष्ट्र ठेवीदार संरक्षण (एमपीआयडी) कायदा कलम २१, २३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे.

तोंडात टॉवेल कोंबून पत्नीची हत्या करणारा आरोपी अटकेत

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : कौटुंबिक वादातून पत्नीच्या तोंडात टॉवेल कोंबून तिची हत्या करणाऱ्या आरोपीला अखेर कल्याण येथून अटक करण्यात गोरेगाव पोलिसांना यश आले. रेखा खातून ऊर्फ राबीया शेख (२३) असे मृत महिलेचे नाव असून तिच्या चारित्र्यावरील संशयावरून पती रॉयल शेख तिच्यासोबत नेहमी भांडण करायचा. रविवारी पत्नीची हत्या करून रॉयल पळून गेला होता. तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिसांनी त्याला शोधून काढले.

रेखा पती रॉयल शेखसोबत गोरेगावमधील तबेला चाळीत राहत होती. ते दोघेही मूळचे कोलकाताचे रहिवाशी आहेत. वर्षभरापूर्वी त्यांचा प्रेमविवाह झाला होता. मूळगावी उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे अखेर त्यांनी सहा महिन्यांपूर्वी मुंबई गाठली होती. रॉयलने गोरेगाव येथील राम मंदिर परिसरातील तबेला चाळीत भाडेतत्त्वावर खोली घेतली होती. पती-पत्नी दोघेही मजुरीचे काम करीत होते. आरोपीला पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात सतत भांडणे होत होती, अशी माहिती शेजाऱ्यांनी दिली.

वाद विकोपाला गेला आणि यापूर्वीही रॉयले रेखाला अनेक वेळा मारहाणही केली होती. रविवारी रात्री रेखा आणि रॉय यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. उभयतांमधील वाद विकोपाला गेला आणि रॉयने रेखाला बेदम मारहाण केली. ती आरडाओरडा करू लागल्यानंतर त्याने रेखाच्या तोंडात टॉवेल कोंबला आणि तिला मारहाण केली. त्यानंतर तिचा गळाही आवळला. ती बेशुद्ध पडल्यानंतर त्याने तेथून पळ काढला. पळताना त्याने घराला बाहेरून कडी लावली.

परिचित महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

काही वेळ बाहेर फेरफटका मारल्यानंतर त्याने रेखाची परिचित असलेल्या राखी शेख (३५) यांना दूरध्वनी केला होता. यावेळी त्याने तिला घडलेला प्रकार सांगितला. तसेच आपल्याकडून रेखाची हत्या झाल्याचेही त्याने सांगितले. त्यामुळे राखी रेखाला पाहण्यासाठी तिच्या घरी गेली होती. यावेळी रेखा जमिनीवर पडली होती. तिला तातडीने ट्रॉमा केअर रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. याप्रकरणी राखी शेखने गोरेगाव पोलिसांकडे तक्रार केली. त्या तक्रारीवरून पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला. रॉयल रेखाची हत्या करून पळून गेला होता. त्याच्या शोध घेण्यासाठी गोरेगाव पोलिसांनी पथक तयार केले. अखेर पोलिसांनी आरोपीला कल्याण रेल्वे स्थानकावरून शोधून काढले आणि रविवारी रात्री अटक केली. आरोपी पश्चिम बंगाल येथील मुर्शिदाबाद येथे पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. आरोपीने हत्येसाठी वापरलेल्या टॉवेल जप्त करण्यात आला आहे. तसेच न्यायवैद्यक तज्ज्ञांनी घटनास्थळावरून काही पुरावे गोळा केले आहेत. गोरेगाव पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत असून आरोपीला सोमवारी न्यायालयपुढे हजर करण्यात आले.

'रयत'चे माजी विद्यार्थी,दानशूर व्यक्तिमत्त्व महेंद्रशेठ घरत यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार!

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : कोकणामध्ये रयत शिक्षण संस्थेचे रोपटे ७० वर्षांपूर्वी अनेक शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून कर्मवीर अण्णांनी लावले. आज त्याचे रूपांतर वटवृक्षात झाले आहे. रामशेठ ठाकूर, महेंद्रशेठ घरत यांच्यासारख्या असंख्य विद्यार्थांचे शिक्षण 'रयत'मुळे झाले. त्यामुळे आज ते यशाची शिखरे पादाक्रांत करीत असताना आपले आयुष्य 'रयत'मुळेच घडले हे न विसरता कोकणातील विद्यार्थी आपल्या विभागातील शाळा-महाविद्यालयांसाठी भरीव आर्थिक मदत करतात.तसेच पश्चिम महाराष्ट्रातील शाळा-महाविद्यालयांच्या इमारत बांधकामासाठीसुद्धा आर्थिक साह्य करीत आहेत. 'रयत'च्या माध्यमातून अण्णांनी शिक्षणाची गंगा आणून अशी माणसे पेरली की तीच आज समाजासाठी झटत आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये असे मत अहिल्यानगर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या चिंचोटी पाटील येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या उदघाटनप्रसंगी माजी कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. त्यांच्या हस्ते चिंचोटी पाटील येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाच्या नूतन इमारतीचे उदघाटन रविवारी (ता. १६)झाले त्यावेळी ते बोलत होते.

चिचोंटी पाटील गाव अवर्षणग्रस्त भागात आहे त्यामुळे तेथील महाविद्यालयाचे काम रखडू नये म्हणून आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी आर्थिक साह्य केले. त्यामुळेच महेंद्रशेठ घरत यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महेंद्रशेठ घरत म्हणाले, रयत शिक्षण संस्थेमधून मिळालेले संस्कार व उच्च दर्जाच्या शिक्षणामुळेच आमच्यासारखे लाखो गरीब विद्यार्थी शिकू शकले. मी आज आंतरराष्ट्रीय पातळीवर आयओएल, आयटीएफ संघटनांवर लीलया काम करतोय. हे केवळ 'रयत'मुळेच घडले म्हणूनच 'रयत'चे उत्तरदायित्व होण्यासाठी 'रयत'ला शक्य तेवढे आर्थिक साह्य करून खारीचा वाटा उचलत आहे मी माझे कर्तव्य करीत आहे. साहित्यिक आणि माजी विद्यार्थी डॉ. संजय कळमकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे (सातारा) व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार आशुतोष काळे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, दरेकर नाना, माजी मंत्री बबनराव पाचपुते, राजेंद्र फाळके, नगरचे माजी सभापती प्रवीण कोकाटे, सरपंच शरद पवार, आप्पासाहेब पवार, फकिरा पवार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक आबासाहेब कोकाटे यांनी केले तर आभार प्राचार्य सी. डी. शिंदे यांनी मानले.आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी आजपर्यंत अनेक ठिकाणी मदतीचा हात दिला आहे. सहकार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिक्षकाच्या आत्महत्या प्रकरणी पोलिसामार्फत गुन्हा दाखल करण्यात यावा-दत्तात्रय(पिंटू) ठोंबरे

केज ■ प्रतिनिधी

केजः शिक्षकाच्या आत्महत्या प्रकरणी पोलिसा मार्फत गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे केज पंचायत समितीचे माजी सदस्य दत्तात्रय(पिंटू) ठोंबरे यांनी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, कृष्णा अर्बन बँक, बीड या ठिकाणी संस्थाचालक पिता पुत्राच्या जाचाला कंटाळून झालेली आत्महत्या ही माझ्या कार्यक्षेत्रातील मयत शिक्षक धनंजय अभिमान नागरगोजे रा. देवगाव ता. केज येथील असून संबंधित संस्थाचालक रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान,१८ वर्षापासून पगार मिळत नसल्याने अध्यक्ष विक्रम बाबुराव मुंडे, उपाध्यक्ष विजयकांत विक्रम मुंडे, सचिव अतुल विक्रम मुंडे यांच्याकडून छळ झाल्याची व आत्महत्या करण्यास सुचवल्याच्या दबावापोटी आत्महत्या करत असल्याची मैदानी फेसबुक पोस्ट करून त्या सर्व आरोपींना सजा शिक्षा होण्याच्या उद्देशाने स्वतः खंबीर पुरावा पोलिसापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करून देखील पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे आकस्मित मृत्यू कसे काय जाहीर करू शकतात.

वरील मुंडे पिता पुत्रांची माझ्या कार्यक्षेत्रात मोठी दहशत गुंडगिरी आहे. त्यांच्यावर यापूर्वी देखील गु.र.नं. ३२३,३२४,३४१,५०४, ५०६, ४२०, ३५३, ३/२५ आर्म ॲक्ट सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच या पिता पुत्राकडे (१)४८/९६,(२)४९/९६ असे दोन परवानाधारक रिव्हॉल्वर असून यांची फार मोठी दहशत असल्याने व सत्ता पक्षाचे कार्यकर्ते असल्याने त्यांच्या विरोधात पुढे येण्याची कोणी हिंमत दाखवत नाही त्यांचा प्रचंड दबाव आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक साहेब आपण वरील धनंजय नागरगोजे यांच्या फेसबुक पोस्ट त्यामध्ये दर्शवण्यात आल्याप्रमाणे पुरावा ग्राह्य धरून तात्काळ पोलीस कार्यवाही व मृत्यूस कारणीभूत तसेच छळ, दबाव, दहशतीच्या संबंधिता विरुद्ध फिर्याद दर्ज करण्यात यावी व वरील प्रमाणे गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्यात यावा.

तसे न झाल्यास मी आज रोजी पत्र दिले पासून आपल्या पोलीस ठाण्यासमोर तात्काळ अन्नत्याग उपोषण करणार आहे. त्याची सर्वस्वी जिम्मेदारी आपल्यावर राहील असे दिनांक १६ मार्च २०२५ रोजी माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय(पिंटू) येडू ठोंबरे यांनी पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, बीड यांना दिलेल्या लेखी निवदनात म्हटले आहे.

या लेखी निवेदनाच्या प्रती पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे शिवाजीनगर,बीड, बजरंग सोनवणे, खासदार बीड, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय बीड, आमदार सुरेश आण्णा धस यांना दिलेल्या आहेत.

नागरिकांनी शासकीय योजनेचा लाभ घेऊन प्रगती कडे वाटचाल करावी -गटविकास अधिकारी लोखंडे

तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के



तेलगाव सोमेश्वर सोनटक्के अन्न वस्त्र निवारा आरोग्य आणि शैक्षणिक बाबी या मूलभूत सुविधा प्राप्त करून घेण्याबरोबरच राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध विकासाच्या योजना पदरात पाडून घेऊन विकासाकडे वाटचाल करावी असे मत धारूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लोखंडे यांनी व्यक्त केले. मौजे पांगरी तालुका धारूर येथील ग्रामपंचायत स्तरावर उपसरपंच श्याम थोरात यांच्या प्रमुख पुढाकारातून ग्राम दरबाराचे आयोजन केले होते त्याप्रसंगी गटविकास अधिकारी लोखंडे मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाला सहाय्यक गटविकास अधिकारी कांदे, विस्तार अधिकारी राऊत, तालुका वैद्यकीय अधिकारी लोमटे, पशुसंवर्धन अधिकारी डॉक्टर राधिका वराडे, आयसीडीएस प्रकल्प मधील कुलकर्णी, यांच्यासह विविध खात्यातील प्रतिनिधी उपस्थित होते. उपसरपंच शाम थोरात यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे येथे स्वागत केले. या ग्राम दरबार सोहळ्यात आरोग्य, कृषी,महिला बालकल्याण, इतर शासकीय व निमशासकीय विभागातील योजनांचे सविस्तर माहिती उपस्थित ग्रामस्थांना दिली ग्रामस्थांनी आपापल्या समस्या मांडून त्यांचे जागेवरच निराकरणही करून घेतले. यावेळी अमोल, थोरात सम्राट थोरात, दत्तात्रय अनंत थोरात, लताबाई माणिक थोरात, भैरवनाथ सखाराम थोरात, संभाजी कोंडीबा गायकवाड, गंगाबाई वसंत गायकवाड यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायत अधिकारी दळवे यांच्या सुरेल सूत्रसंचालन मुळे कार्यक्रम कार्यक्रमातील उत्साह दिसून आला.

राज्यस्तरीय एम टी एस परीक्षेमध्ये मराठवाड्याचे वर्चस्व; राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये २० पैकी ११ विद्यार्थ्यांचा समावेश तर कृष्णराज चव्हाण, आर्यन कावळे, आर्यन मुंडे हे राज्यातून सर्वप्रथम

केज ■ प्रतिनिधी

केजः सध्याच्या या स्पर्धेच्या युगात स्पर्धा ही इतरांशी न करता स्वतःशीच करावी लागणार आहे. म्हणून पालक अगदी लहान वर्गापासून विद्यार्थ्यांचा बौद्धिक स्तर वाढवा म्हणून विविध स्पर्धापरीक्षेला आपल्या पाल्यांना बसवत आहेत. तेंव्हा मागील पंचेवीस वर्षापासून महाराष्ट्रामध्ये जळगाव येथील शासनमान्य एमटीएस राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा आयोजित केली जाते. दरवर्षी या परीक्षेला जवळपास पन्नास हजार पेक्षा अधिक विद्यार्थी बसतात. यावर्षीही ही परीक्षा संपूर्ण महाराष्ट्रात १९ जानेवारी २०२५ रोजी पार पडली. तसेच दि. ४ मार्च रोजी या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. एकूण २० पैकी मराठवाड्यातील ११ विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये आले आहेत. यामध्ये चव्हाण कृष्णराज स्वप्नील इ. ४ थी डी.व्ही.एम. स्कूल पुयानी, नांदेड राज्यातून सर्वप्रथम, कावळे आर्यन अंजनराव इ. ६ वी छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कूल अंबेजोगाई राज्यातून सर्वप्रथम, मुंडे आर्यन अंगद इ. ७ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि .केज बीड राज्यातून सर्वप्रथम, वाधवानी नमिश रितेश इ. २ री संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल, लातूर राज्यातून सर्वद्वितीय, कापसे सिद्धांत संदिप इ. २ री योगेश्वरी नूतन विद्यालय प्राथमिक विभाग अंबेजोगाई, राज्यातून सर्वतृतीय, चुंगे सार्थक संतोष इ. ३ री ओरियन इंग्लिश मीडियम स्कूल, उमरगा राज्यातून सर्वद्वितीय, भोसले समर्थ तुळशीदास इ. ३ री ग्रीनलँड स्कूल धाराशिव, राज्यातून सर्वतृतीय, माटे सिद्धी बालाजी इ. ४ थी अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव, राज्यातून चौथी, दांगट श्वेता रंजीत इ. ६ वी अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव,राज्यातून चौथी,मोदानी तेजस रुपेश इ. ७ वी अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव राज्यातून सर्वतृतीय, जाधव संस्कृती सिद्धेश्वर इ. ७ वी वाशी, राज्यातून सर्वतृतीय आली आहे.

केज तालुक्यातील विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश- ही राज्यस्तरीय एम. टी. एस. परीक्षा केज तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड माध्यमिक विभाग .या शाळेमध्ये दि. १९ जानेवारी २०२५ रोजी पार पडली. या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये- गायकवाड सई नवनाथ इ. २ री शारदा इंग्लिश स्कूल केज केंद्रातून सर्वप्रथम, धवलशंक वेदिका विनायक इ. ३ री स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि..केज केंद्रातून सर्वप्रथम, शिंदे स्वप्नील राहुल इ. ३ री जि. प. प्रा. शाळा जाधवजवळा केंद्रातून द्वितीय, सय्यद सिद्दीक जब्बार इ ३ री जि. प. उच्च प्रा. शाळा उमरी केंद्रातून तृतीय, भांडवलकर अनुष्का दत्ता इ. ३ री स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि. . केज केंद्रातून चौथी, शिंपले प्रथमेश गणेश इ. ३ री केंद्रातून चौथी जि. प. उच्च प्रा. शाळा उमरी केंद्रातून चौथी, मुळे पुजा बालासाहेब इ. ३ री केंद्रातून चौथी जि. प. उच्च प्रा. शाळा उमरी केंद्रातून चौथी, बरुरे प्रथमेश संजय इ. ४ थी शारदा इंग्लिश स्कूल केज केंद्रातून सर्वप्रथम, पंडित सोमराज संजय इ. ४ थी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि. .केज केंद्रातून द्वितीय, सत्वधर श्रवण अविनाश इ. ४ थी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि. .केज केंद्रातून तृतीय, ढाकणे अंश बबन इ. ६ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि. .केज केंद्रातून सर्वप्रथम, मुंडे आर्यन अंगद इ. ७ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि. .केज राज्यातून सर्वप्रथम, चाटे ओमकार सूर्यकांत इ. ७ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ड प्रा. वि. . केज केंद्रातून द्वितीय आला आहे.

सदरील परीक्षेसाठी महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यातून असंख्य विद्यार्थी बसवले जातात. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी लातूर येथील मराठवाडा विभागीय प्रमुख शंभुलिंग विश्वनाथप्पा नागुरे तर प्रत्येक तालुक्याच्या नियोजनासाठी तालुका समन्वयक प्रतिनिधी म्हणून कार्य करतात. केज तालुका प्रतिनिधी बी. एम. टिंगरे, अंबेजोगाई तालुका- एस. यु. राऊत, बीड तालुका- व्हि. डि. जोशी, उस्मानाबाद तालुका- येडके सर, उमरगा तालुका- पद्माकर मोरे आदी तालुका समन्वयक म्हणून काम पाहतात.

या शासनमान्य राज्यस्तरीय एम. टी. एस. परीक्षेला तालुक्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने बसावे. तसेच पुढील वर्षापासून ग्रामीण व शहरी असे दोन भाग करून ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे अशी माहिती एम. टी. एस. केज तालुका समन्वयक श्री. टिंगरे बी. एम. यांनी दिली.

सौ संजीवनी जाधव ठरल्या मिसेस माजलगावच्या मानकरी

रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्यावतीने मिसेस माजलगाव कार्यक्रम संपन्न

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव : दिनांक १६ मार्च रोजी रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुल च्यावतीने मिसेस माजलगाव या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धचे आयोजन इगलवूड स्कूल फुले पिंपळगाव येथे करण्यात आले होते...

सदरील कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ संजीवनी जाधव तर द्वितीय क्रमांक डॉ सौ प्रियांका डाके यांनी मिळवला. तृतीय क्रमांक सौ शीतल मालानी यांनी मिळवला आणि सौ शुभांगी आनंदगावकर यांनी चौथ्या स्थानावर येण्याचा मान मिळवला.

या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बक्षिसे जिंकली.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ?ड रवींद्र कानडे प्रकल्प प्रमुख डॉ अर्चना पवार व सर्व रोटरियन अशोक बजाज ,लक्ष्मीनारायण मुंदडा, शशी किरण गडम, सुरेश भानप ,पंडित तिडके ,डॉ स्वानंद कुलकर्णी, जगदीश साखरे, गवारे सर, दिगंबर महाजन ,डॉ सौ अंजली अकोलकर डॉ सौ अर्चना मोरे ,सौ स्मिता लिमगावकर, शोभा वर्मा ,सौ सोळंके मॅडम उपस्थित होते.

त्याचप्रमाणे इनरव्हील क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्ष सौ प्राजक्ता गुंडेवार ,सेक्रेटरी सौ स्मिता कानडे व इनरव्हील क्लबच्या सर्व मेंबर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. जान्हवी वाघ आणि कु. प्रांजल देशमुख या विद्यार्थीनिंनी केले .

मिसेस माजलगाव या सौंदर्य स्पर्धेचे सूत्रसंचालन सौ प्रणिता मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजित सरांनी केले. सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव शहर व परिसरातील शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या...

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे सर्व सदस्य , ईगलवूड इंग्लिश स्कूल व श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले...

सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

बीड ■ गितांजली लव्हाळे

बीड वडवणीः सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन विद्येची देवता सरस्वती व नटराजाच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.जि.प.सदस्य तथा पिंपळनेर चे सरपंच मनोज काका पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख गोविंद सारडा सर, गणेश खांडे (सरपंच म्हाळस जवळा), गोरक नाना कांडेकर (शालेय समिती अध्यक्ष पिंपळनेर) अशोक होळकर (संपादक बीड प्रहार) अरुण बोंगाणे (संचालक गजानन स.सुतगिरणी), दुश्यंत नाना डोंगरे (भाजपा नेते) कैलास थोटे उपसरपंच सुर्डी, शंकर कदम उपसरपंच ईट-गंगनाथवाडी, पत्रकार रामेश्वर जाधव, पत्रकार जुनेद कुरेशी, सुभाष बाप्पु सावंत, भारत जवळकर मा.सरपंच, भागवत अण्णा दुबाले,अशोक नागरगोजे,परमेश्वर नागरगोजे, सुरेश यादव, लक्ष्मण सातपुते, कुंडलिक लटपटे सर (स्वामी विवेकानंद विद्यालय बावी), साईनाथ गावडे सर (संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल मादळमोही) शेषनारायण पैठणे सर , प्रधान सर,सयाजी मुंडे सर, भोसले सर,जाधव सर, साळवे सर ,कार्यक्रमाच्या मार्गदर्शनात दुश्यंत नाना डोंगरे यांनी शाळेच्या कार्याचा गौरव केला आणि शाळेची भविष्यातील वाटचाल कौतुकास्पद असेल.. त्याचबरोबर अशोक नाना होळकर यांनी भविष्यात शाळेतील विद्यार्थी अनेक क्षेत्रात उल्लेखनीय काम करतील असा विश्वास व्यक्त केला.

सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर चे वार्षिक स्नेहसंमेलन म्हटले की पिंपळनेर परिसरात उत्साहाचं वातावरण असतं ते आज देखील दिसुन आलं परिसरातुन पालक, कला प्रेमी यांनी विद्यार्थ्यांवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी शेकडोच्यां संख्येने उपस्थिती पहायला मिळाली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रथम गणरायाला वंदन करुण,देशभक्तिपर गीते, बालगीते, गोंधळगीते,लावणी, कोळिगिते आदी गीतांवर सामूहिक नृत्य सादर करून पालकांची मने जिंकली. नाटीकेच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, बालविवाह, मोबाईल मुळे बदलणारे जिवन असे अनेक महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आले...

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थीनी कु.समिक्षा सातपुते व कु. अनुजा यादव यांनी केले.

वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामेश्वर सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली विलास आरे सर, संतोष नागरगोजे सर, जिवन नागरगोजे सर, किरण साळवे मॅडम, शितल सातपुते मॅडम, ज्योती नरवडे मॅडम, मंजुश्री पौळ मॅडम, किर्ती सातपुते मॅडम, शिवाणी मॅडम, निकीता मॅडम, सारीका सावंत मॅडम,आनेराव मावशी, हनुमान तात्या खांडे, निलेश वंजारे,गणेश कुटे,भरत खांडे, अकाश नांदुरकर,गणेश सापुते यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

किती विनाअनुदानित शिक्षकांचा बळी घेतल्यावर सरकार वाढीव टप्प्यासाठी आर्थिक तरतूद करणार

विनाअनुदानित शिक्षकांचा संतप्त सवाल ; वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक तरतूद करा; अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

बीड ■ प्रतिनिधी



बीड : बीड जिल्ह्यातील एका विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी वेतनासाठी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले ही महाराष्ट्रासाठी अत्यंत खेदाची आणि चिंताजनक बाब आहे. या सरकारला अजून किती विना अनुदानित शिक्षकांचा बळी घेतल्यानंतर विना अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना वाढीव टप्प्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणार? शिवाय शंभर टक्के अनुदान कधी देणार? असा संतप्त सवाल महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे छत्रपती संभाजीनगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, उपाध्यक्ष भागवत यादव यांनी केला आहे.

बीड जिल्हासह महाराष्ट्रामध्ये हजारो विनाअनुदान तत्त्वावर सुरू असलेल्या शाळेमध्ये लाखोंच्या संख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी काम करत आहे. या सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पगारासाठी आपल्या हक्काच्या वेतनासाठी वारंवार आंदोलन केली. तेव्हा सरकारने अनुदान जाहीर केले. परंतु अनुदान जाहीर केल्यापासून अजतागायत १००ङ अनुदान देण्यापासून वंचित ठेवले आहे. सध्या जे शिक्षक २०ङ४०ङ६०ङ टक्के अनुदानावर काम करत आहेत. त्या शिक्षकांना पुढील वाढीव टप्पा अनुदान मिळावे यासाठी या सर्व शिक्षकांनी मागच्या वर्षी तब्बल पाच ते सहा महिने सातत्याने आंदोलन केले. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने आचारसंहिता लागण्यापूर्वी या सर्व शिक्षकांना वाढीव टप्पा अनुदान घोषित केले. तसेच या संदर्भात १० ऑक्टोबर २०२४ रोजी शासन आदेश काढला. परंतु अद्यापही वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद केली नाही. त्यामुळे अनुदानाचा टप्पा वाढला असला तरी अद्याप शिक्षकांच्या वेतनात वाढ झाली नाही. त्यामुळे वाढीव टप्पा अनुदानापासून हे सर्व शिक्षक वंचित राहिले आहेत. सरकारच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद होईल असे वाटत होते. परंतु निधीची तरतूद न झाल्यामुळे या शिक्षकांच्या पदरी निराशा आली. एकीकडे अनुदान नाही दुसरीकडे कुटुंबांचा खर्च भागविणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे हे सर्व शिक्षक चिंताग्रस्त झाले आहे.

निराशाच्या गर्गेत जीवन जगत आहेत. या निराशेतूनच काल बीड जिल्ह्यातील एका विनाअनुदान शाळेत काम करणाऱ्या धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलले. सरकारने जर जाहीर केलेल्या वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद केली असती तर धनंजय नागरगोजे यांचा जीव वाचला असता. एकंदरीत या सरकारला विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या बाबतीत गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे.

विविध टप्प्यावर काम करत असणाऱ्या शिक्षकांना शंभर टक्के अनुदान कधी देणार? अजून किती विना अनुदानित शिक्षकांचा बळी गेल्यावर सरकार विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या पगारासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणार ? तसेच या सरकारला अजून किती शिक्षकांचा बळी घ्यायचा ? असा संतप्त सवाल

मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे महिला संघटनेच्या महिला आघाडीच्या मराठवाडा संघटक मुक्ता मोटे, दैवशाला मुंडे, सुरेखा गायकवाड मॅडम, मस्के मॅडम, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जिल्ह्याचे पदाधिकारी सौंदलकर, शेख, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, पंकज कळसकर, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव, वडवणी तालुका अध्यक्ष वैजिनाथ शिंदे, गेवराई तालुका अध्यक्ष दीपक गरूड, आष्टी तालुका अध्यक्ष रविंद्र भुकन, पठाण, मोरे, गवळी, बाळासाहेब नागरगोजे, प्रताप देशमुख, श्रीराम जाधव, गोविंद आघाव, भालके, सुरेश कदम, जावेद पठाण, मुंडे यांच्यासह आदींनी उपस्थित केला आहे. दरम्यान तातडीने वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात आला.

परदेशी कुटुंबियांचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित : प्रशासनाकडून २० मार्च पर्यंत मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन

मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा परदेशी कुटुंबियांचा इशारा ; प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

दै, जनप्रभात उरण ता. प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : शेवा कोळीवाडा (जुना शेवा कोळीवाडा)चे प्रकल्पग्रस्त,शेतकरी आणि दुग्ध व्यवसाय असे पारंपरिक व्यवसाय असणारे परदेशी कुटुंबियांचे पुनर्वसन उरण बोरी पाखाडी सरकारी खाजण स्मशान भूमी जवळकरण्यातआले. बोरीपाखाडी स्मशान भूमी जवळ परदेशी कुटुंब गेली ४० वर्ष वास्तव्यास आहे. मात्र पुनर्वसित असून देखील परदेशी कुटुंबियांना शासनाच्या पुनर्वसन कायदे अंतर्गत हव्या तशा १३ नागरी सेवा सवलती शासनाकडुन उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यातच परदेशी कुटुंबियांना दररोज पिण्याचे पाणी मिळत नसल्याने या परिसरात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर झाली आहे. गेली ३ महिने पिण्याचे पाणी मिळत नसल्याने तसेच या संदर्भात शासनाच्या सर्वच विभागात अनेक महिने पत्रव्यवहार करून देखील न्याय न मिळाल्याने परदेशी कुटुंबियांनी अखेर आमरण उपोषणाचे हत्यार उपसले.कायदेशीर व शांततेच्या मार्गाने पत्रव्यवहार करून देखील न्याय मिळत नसल्याने परदेशी कुटुंबीयांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. पाणी कनेक्शन कट करून परदेशी कुटुंबियांना मानसिक व शारीरिक त्रास देणाऱ्या पाणी कमिटीला ब्लॅक लिस्ट मध्ये टाकून ती समिती बरखास्त करावी. न्यायालयाचे आदेश परदेशी कुटुंबीय यांच्या बाजूने असताना संपूर्ण परदेशी कुटुंबियांना जेएनपीटीने टाकून दिलेल्या ग्रामपंचायतीच्या लाईन वरून पाणी मिळावे. आणि हे पाणी दररोज मिळावे. पाणी न सोडणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी. या घटनेस जे जे दोषी आहेत त्यांची सखोल चौकशी करून संबंधितांवर उचित कारवाई करावी. या प्रमुख मागणीसाठी दिनांक १७/३/२०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून परदेशी कुटुंबिय पंचायत समिती कार्यालय उरणच्या आवारात आमरण उपोषणाला बसले होते. या उपोषणाला विविध शासकीय कर्मचारी, अधिकारी संघटनेने, विविध सामाजिक संस्था, उरण मेडिकल असोसिएशन इत्यादी संघटनानी जाहिर पाठिंबा दिला.शिवसेना शिंदे गटाचे रायगड जिल्हा प्रमुख अतुलशेठ भगत, तालुका प्रमुख दिपक ठाकूर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट)चे उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते महादेव बंडा, महिला तालूकाअध्यक्ष सीमा घरत, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)चे रायगड उपजिल्हा प्रमुख नरेश रहाळकर, भारतीय जनता पार्टीचे उरण तालुका उपाध्यक्ष पंडित घरत,शिवसेना शाखा प्रमुख कमळाकर कोळी माजी सरपंच हनुमान कोळीवाडा गौरव कोळी आदी राजकीय नेत्यांनी प्रत्यक्ष भेटून जाहीर पाठिंबा दिला. या सर्वच राजकीय पदाधिकाऱ्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना धारेवर धरले. पाणी हे अत्यावश्यक सेवा आहे. ते थांबविता येत नाही. प्रत्येकाला पाणी मिळाले पाहिजे. ती मूलभूत गरज आहे असे सांगत सर्वच राजकीय पदाधिकाऱ्यांनी परदेशी कुटुंबियांना पाणी मिळवून देण्यासाठी शासकीय स्तरावर जोरदार प्रयत्न केला. वाढता तीव्र विरोध लक्षात घेता व परदेशी कुटुंबियांची रास्त मागणी लक्षात घेता प्रशासनाने वेगाने सूत्र हलविली. पोलीस प्रशासन व पंचायत समिती प्रशासन व सर्वपक्षीय पदाधिकारी यांच्यात संयुक्त बैठक झाली.त्यात प्रशासनातर्फे परदेशी कुटुंबियांना न्याय देण्याचे आश्वासन देण्यात आले. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तथा प्रशासक विनोद मिंडे, ग्रामपंचायत अधिकारी विनोद मोरे यांनी मध्यस्थी करत हा प्रश्न गुरवार दिनांक २० मार्च २०२५ पर्यंत सोडविण्याचे आश्वासन दिले. आम्हाला २० तारखे पर्यंत वेळ दया आम्ही हा प्रश्न सोडवूअसे शासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. शासकीय अधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्याने परदेशी कुटुंबियांनी सुरु केलेले आमरण उपोषण तात्पुरते स्थगित केले.आमरण उपोषणास बसलेले ८९ वर्षाचे जेष्ठ नागरिक तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू संतोष परदेशी यांचे वडील अनंत परदेशी यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी नारळपाणी पाजले. नारळ पाणी पिऊन अनंत परदेशी आणि त्यांच्या कुटुंबियांनी सदर आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करीत असल्याचे जाहीर केले. मात्र २० मार्च २०२५ पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अनंत परदेशी (वय ८९) व उपोषणाला बसलेले कृपेश अनंत परदेशी, नवनीत रामकिसन परदेशी,कुमारी जयश्री रामकिसन परदेशी,आरती नवनित परदेशी,डॉक्टर दया महेश परदेशी, पल्लवी संतोष परदेशी,रिना हर्षल परदेशी यांनी दिला आहे. आता प्रशासन परदेशी कुटुंबियांना न्याय देते की पुन्हा टाळाटाळ करत वेळ मारून नेते हे पाहणे महत्वाचे ठरेल. प्रशासनाच्या भूमिकेकडे आता परदेशी कुटुंबियांसह इतर नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मध्ये नामविस्तार मुद्दा तापला;आधी सभेत गोंधळ चर्चेविना स्थगन प्रस्ताव कुलगुरूंनी स्वीकारला



कराड ■ राहुल पवार

सातारा कराड : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांनी शिवाजी विद्यापीठ स्थापनेमध्ये पुढाकार घेतला होता त्यावेळी शिवाजी विद्यापीठाचे नाव छत्रपती शिवाजी विद्यापीठ असावे का शिवाजी विद्यापीठ असावे हा मुद्दा उपस्थित झाला होता त्यानंतर यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पर्यंत हा मुद्दा गेला होता बरेच खलबत्त झाले होते शिवाजी विद्यापीठ च त्यावर स्पष्टीकरण दिलेले होते पुन्हा हा मुद्दा चर्चेला आला आहे त्यामुळे शिवाजी विद्यापीठ वातावरण चांगलेच तापले सूय.चंद्र. तारे. असेपर्यंत. शिवाजी विद्यापीठ. च आधी सभेची सभागृहाची भूमिका स्पष्ट.. नामविस्तारास तीव्र विरोध सभागृहात गोंधळ सदस्यांची घोषणाबाजी करीत निषेध फलक..... कुलगुरूंनी चर्चा विनाच स्थगन प्रस्ताव स्वीकारला.गेल्या काही दिवसापासून गाजत असलेला शिवाजी विद्यापीठ नामविस्तार मुद्द्यावर आधी सभा प्रचंड गोंधळ झाला सदस्यांनी कडाडून विरोध करत सूय.चंद्रतारेअसेपर्यंत. शिवाजी विद्यापीठ च नाव राहणार अशी आक्रमक भूमिका घेतली नामविस्तारास विरोध म्हणून घोषणाबाजी करून निषेध फलक प्रशासन व सदस्य सुमारे एक तास चर्चा गोंधळ सुरू होता सिनेट सदस्य अभिषेक मिठारी यांनी मांडलेला नामविस्तार विरोधातील स्थगन प्रस्ताव कुलगुरू . डॉ. डी .टी. शिर्के यांनी चर्चेविनाच स्वीकारला शिवाजी विद्यापीठ नामविस्तारास सदस्यांच्या कडून प्रचंड विरोध करण्यात आला १९६२ ला शिवाजी विद्यापीठ स्थापना झाली त्यावेळी विद्यापीठाचे नाव हे काय असावं याबद्दल खलबत्त झाले होते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेबांनी या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली होती जर पाच वर्षांनी हाच मुद्दा पुन्हा उपस्थित होत आहे शिवाजी हे नाव आमच्यासाठी प्रेरणा आहे आदर्श आहे आमच्या भावना त्याच्याशी जोडले आहेत आमच्यासाठी ते नाव ऊर्जा आहे त्याचा शॉर्ट फॉर्म करून त्याचं नामकरण होऊ नये यासाठी शिवाजी विद्यापीठ नाव असावे सूर्य चंद्र तारे असेपर्यंत शिवाजी विद्यापीठ च नाव असावी अशी सदस्यांनी भूमिका घेतली त्यामुळे वातावरण चांगले तापले होते शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्प अधिवेशनात ६८८५ कोटीच्या संभाव्य बजेटवर चर्चा झाली सिनेट सदस्यांनी मंजुरी दिलीविद्यार्थ्यांच्या हितासाठी अनेक योजना यावर सविस्तर चर्चा झाली विद्यार्थ्यांच्या पायाभूत सुविधा संशोधन वस्तीग्रह विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण योजना यांच्यावरही चर्चा झाली५८ ठराव्यापैकी १२ ठराव मंजूर करण्यात आले सिनेट सदस्यांकडून मांडले जाणारे १२ ठराव मंजूर झाले आणि ४६ ठराव मागे घेण्यात आलीविद्यापीठ विकासासाठी व विद्यार्थी विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली सातारा जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य अमित जाधव प्रसार माध्यमांना दिली आहे शिवाजी विद्यापीठ नामविस्तारास सिनेट सदस्यांचा विरोध आहे कारण शिवाजी विद्यापीठ च, हे नाव चंद्र सूर्य तारे असेपर्यंत हेच नाव असावे अशी भूमिका आहे शिवाजी विद्यापीठाचा शॉर्ट फॉर्म न करता शिवाजी विद्यापीठ च असावे अशी भूमिका शिवाजी विद्यापीठ सभागृह सदस्य व इतिहास तज्ञ यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना याविषयी चर्चा झाली होती शिवाजी विद्यापीठ च अभ्यासपूर्ण ठेवले आहे असे जाणकार नागरिक चर्चा शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुरू आहे.

रवळगाव येथे शेत आखाड्यावरून अज्ञात चोट्यांनी आठ शेळ्या सह दोन पिल्ले लांबविल्य

सेलू ■ प्रतिनिधी

सेलू तालुक्यातील रवळगाव शिवार मध्य काल रात्री पावणे बाराच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी आठ शेळ्या सह शेळ्यांचे पिल्ले चोरून नेले. मिळालेली माहिती अशी आहे की. शेतकरी राणू दगडू भदर्गे यांनी राजेंद्र केवारे यांची गट नंबर ८८ मधील शेती ठोक्याने केली होती. या शेतीमध्ये पत्राचे घर ठोकून आखाडा तयार केला होता. या आखाड्यावर नेहमीप्रमाणे शेळ्या चारून आखाड्यासमोर मोकळ्या जागेमध्ये बांधल्या होत्या. रात्री सात वाजता घराकडून शेतात आल्यानंतर शेतात शेळ्या होत्या. नंतर मध्यरात्री शेळ्यांचा आवाज आला आणि जाग आली त्यातील काही चोरटे राणू भदर्गे यांच्याकडे आले व त्यांचे हात पाय बांधून त्यांना चाकू दाखवून धाक दाखवला. व काही चोरटे नी आठ शेळ्या सह एकूण ७२ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. प्रकरणी राणू भदर्गे यांच्या फिर्यादीवरून सेलू पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरातील शेत आखाड्यावर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

चतुर्थी दिनी घेतले लाखो भाविकांनी श्री विघ्नहराचे दर्शन

जुन्नर ओझर ■ सचिन थोरवे



जुन्नर /ओझर : अष्टविनायकांतील मुख्य स्थान असलेल्या श्री क्षेत्र ओझर येथे पहाटे ५ वाजता श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष मा. बाळासाहेब कवडे,विश्वस्त विनायक मांडे,शिल्पाताई जगदाळे यांच्या शुभाहस्ते श्रींना महाअभिषेक पूजा करून दर्शानासाठी मंदिर खुले करण्यात आले.मंदिरामध्ये चतुर्थी निमित्त महाआरती करण्यात आली. महाआरतीचा मान समीर टेमगिरे,गौरव टोपे,प्रतिक कवडे,चंद्रकांत काचळे,मयुरेश दिघे यांना मिळाला. आज विशेष म्हणजे तिथी प्रमाणे शिवजयंती असल्याने या माहाआरतीमध्ये शिवरायांची देखील आरती करण्यात आली. या आरती मध्ये अध्यक्ष बाळकृष्ण कवडे ,उपाध्यक्ष तुषार कवडे,सचिव सुनील घेगडे,खजिनदार दत्तात्रय कवडे,विश्वस्त,सुर्यकांत रवळे,विक्रम कवडे, विनायक मांडे , संतोष कवडे , विलास कवडे , विनायक जाधव, सौ.शिल्पा जगदाळे,यांची उपस्थिती होती. पहाटे पाच ते रात्री आकरापर्यंत रांगेत सुमारे एक लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. सकाळी ७.३० वा. व दुपारी १२.०० वा. मध्यान्ह आरती करण्यात आली. सकाळी ८.०० वा. नियमित पोथी वाचन करण्यात आले.सकाळी १०.३० वा.''श्री' स नैवद्य दाखवून भाविकांना खिचडी वाटप श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट च्या वतीने करण्यात आली. आज संकष्टी चतुर्थी निमित्ताने विघ्नहर मंदिरात फुलांची आरस विघ्नहराला रेशमी जरीचा पोशाख करण्यात आला होता. तसेच सोन्याचे अलंकार श्री विघ्नहराला परिधान करण्यात आले. व येणाऱ्या भाविकांसाठी मंदिरात दर्शनरांग,पिण्याचे पाणी,अभिषेक व्यवस्था. देणगी कक्ष ,अभिषेक करण्यासाठी शमी वृक्षाखाली व्यवस्था,दर्शन झाल्यानंतर विसाव्यासाठी विघ्नहर उद्यान ,चप्पलेंहू पार्किंग, कमीत कमी वेळेतील दर्शनासाठी मुखदर्शन व्यवस्था इत्यादी व्यवस्था करण्यात आली. तसेच पार्किंग तळावरील १०० बाय २०० चे पत्राशेडचा भाविकांनी उपयोग करून घेतला .सायंकाळी ७.०० वा. नियमित हरिपाठ करण्यात आले. व चंद्रोदयापर्यंत कीर्तनकार ह.भ.प.योगिता बढे,धालेवाडी,यांचे हरिकीर्तन झाले.त्यांना साथसंगत राम प्रसादिक भजनी मंडळ शिरोली यांनी दिली. आजचे अन्नदाते संतोष शांताराम कवडे,ओझर यांनी चतुर्थीचे वारकरी अन्नदान केले रात्रौ १०.३० वाजता शेजआरती करून ११.०० वाजता मंदिर बंद करण्यात आले. आजच्या महाआरतीच्या मानकरी यांनी विकास कामात सहभागी होवून ट्रस्ट ला देणगी दिली. दानशूर व्यक्तीमत्व समीर टेमगिरे,शिवाजीराव एलमामे,प्रतिभा कुलथे यांनी देवस्थान ट्रस्ट ला देणगी दिली.आलेल्या भाविकांचे स्वागत देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे ,उपाध्यक्ष तुषार कवडे,सचिव सुनील घेगडे,खजिनदार दत्तात्रय कवडे,विश्वस्त, प्रकाश मांडे , सुर्यकांत रवळे, गोविंद कवडे ,विक्रम कवडे, समिर मांडे , विनायक मांडे , संतोष कवडे , विलास कवडे , विनायक जाधव, मंगेश पोखरकर,सौ.शिल्पा जगदाळे, यांनी केले. गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्ट चे व्यवस्थापक व कर्मचारी यांनी केले.

रिक्षा चालकांच्या जीवनावरील 'तीन चाकांवर चार भिंतीचा संसार' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न !

लोणंद ■ पांडूरंग कुंभार



लोणंद : कोणतंही पुस्तक लिहिणं ही साधीसुधी बाब नाही आणि हे प्रत्येकाला जमेलच असं अजिबात नाही, आणि त्यातल्या त्यात ऑटो रिक्षा चालक-मालकांच्या जीवनावर आधारित पुस्तक लिहिणं ही तर फार अवघड बाब आहे असे उदगार ऑटो रिक्षा चालक-मालक संयुक्त कृती समिती महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस विलास भालेकर यांनी केले.

रिक्षा चालक व मालकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर पीएच्. डी करून प्रा. डॉ. भिमराव मोरे यांनी लिहिलेल्या 'तीन चाकांवर चार भिंतीचा संसार' या शीर्षकाखाली मराठी भाषेतील महाराष्ट्रातील पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन दौंडचे आमदार एड. राहुल दादा कुल यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आमदार एडवोकेट राहुलदादा कुल यांनी रिक्षा बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे सांगून त्यांच्या विषयी असणाऱ्या सर्व मागण्या शासन दरबारी मांडून त्यांना वेळोवेळी लागेल ते सहकार्य करणार असल्याचेही यावेळी सांगितले व प्रा. भिमराव मोरे यांच्याकडून भविष्यात अशाप्रकारे आणखी सामाजिक कार्य घडावे अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

सदरचा प्रकाशन सोहळा शनिवारी (ता. १५) हॉटेल प्राईम स्क्वेअर, दौंड याठिकाणी संपन्न झाला. याप्रसंगी बारामती-दौंड-इंदापूर रिक्षा कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत (नाना) सातव या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी बारामतीचे मोटार वाहन निरीक्षक नितीन घोडके व त्यांचे सहकारी, नांदेडच्या टायगर ऑटो रिक्षा संघटनेचे अध्यक्ष अहमद बागवाले, भीमथडी शिक्षण संस्थेचे प्रेमसुख कटारिया, हरिभाऊ ठोंबरे, नितीन शिंदे, बी वाय जगताप, आबासाहेब वाघमारे, डॉ. मधुकर मोकाशी, डॉ. सदाशिव शिरगावे, मुखपृष्ठकार रमेश नावडकर, आण्णासाहेब समिंदर, श्रीमती लक्ष्मीबाई पांडुरंग मोरे, एड. शितल मोरे इत्यादी प्रमुखांसह परिसरातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

श्री. भालेकर पुढे म्हणाले प्रा. डॉ. भिमराव मोरे यांचा ऑटो रिक्षा व्यवसाय नसताना देखील त्यांनी ऑटो रिक्षा चालक-मालक यांच्या जीवनावर बारकाईने अभ्यास करून पीएच्. डी करून त्यावर पुस्तक लिहिणारी देशातील पहिली व्यक्ती आहे. आणि अशा व्यक्तीला राज्य सरकारने पद्मश्री पुरस्कार द्यायला पाहिजे अशी मागणीही श्री. भालेकर यांनी व्यक्त केली.

या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी बारामती-दौंड-इंदापूर रिक्षा कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत (नाना)सातव, मधूतारा संस्थेचे अध्यक्ष नितीन शिंदे, भीमथडी शिक्षण संस्थेचे प्रेमसुख कटारिया, बारामती प्रादेशिक परिवहन विभागाचे नितीन घोडके यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून प्रा. डॉ. भिमराव मोरे यांना शुभेच्छा दिल्या.

हा प्रकाशन सोहळा व्यवस्थित रित्या पार पाडण्यासाठी दौंड ऑटो रिक्षा महासंघाचे पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक रवि पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार उत्तम लोंढे यांनी मानले.

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती उत्सव सोहळा संपन्न

आंबेगाव ■ संतोष गावडे



आंबेगाव:आंबेगाव :मंचर शहरामध्ये आज दि. १७ रोजी तिथीनुसार शिवजयंती मंचर शहरामध्ये शिवराय उत्सव समिती व धनेश बाणखेले युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आली.यावेळी भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच छत्रपतींच्या विचारांचा वारसा अनुसरून गो शाळेसाठी चारा गो शाळेचे व्यवस्थापक विजूजी थोरात यांच्याकडे सुपूर्त केला.

मॅरेथॉन स्पर्धेमध्ये अनेक तरुणांनी भाग नोंदवला तसेच बक्षीस वितरण सोहळा प्रमुख अतिथी भाजपा नेते जनसेवक श्री संजय भाऊ थोरात व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी संजय भाऊ थोरात म्हणाले की,आपल्या पराक्रमाने दाहीदिशा उजळून टाकणाऱ्या आणि हिंदुधर्म रक्षिणाऱ्या महापराक्रमी शिवसूर्याची आज जयंती महाराजांसारखा युगपुरुष जन्माला येणे हे तर भारत भूमीचे सौभाग्य महाराजांनी आपल्या कृतीतून,उक्तीतून,व्यक्तिमत्त्वातून भारत मातेचा सुपुत्र कसा असावा याचा आदर्श घालून दिला.केवळ शिवाजी महाराज की जय असा जयजयकार करून शिवजयंती साजरी होणार नाही,तर महाराजांच्या चरित्राची वारंवार उजळणी होणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.तसेच अतिशय सुंदर असा कार्यक्रम मंचर शहरामध्ये शिवराय उत्सव समिती व धनेश बाणखेले युवा मंच सर्व सहकाऱ्यांनी आयोजित केला त्या सर्वांचे अभिनंदन. मॅरेथॉन स्पर्धेमध्ये विजेते स्पर्धक -१३ ते १६ वर्ष वयोगट स्पर्धा विजेते(मुले) हर्ष प्रमोद पाटील,प्रतिक पवार,समर्थ रामदास वळे,किशोर नामदेव गोडे,शहजाद मन्नेवर मन्सूरी, प्रदीप प्रकाश पोगाळे १३ ते १६ गट विजेत्या(मुली)- आदिती धनंजय हरगुडे,सृष्टी तुषार लोंढे,ज्ञानेश्वरी विक्रम लामखडे,आदिती अभिजित कड,प्रांजल बाजीराव जाधव , नेहा दीपक फापाळे,आर्या मनोज डोळे खुला गट (मुले)-धुळदेव भागरे, ऋषीकेश वावरे,मयुर हौसिराम नायकोडी,सचिन भारद्वाज,चेतन भाऊराव जाधव खुला गट (मुली)- मानसी यादव, साक्षी भास्कर भंडारी,कीर्ती रत्नाकर तांबे,समृद्धी जाधव, भाग्यश्री भास्कर भंडारी छोटा गट (मुले)- १२ वर्षापर्यंत शोएब अजीज शेख,सरफराज पप्पू शेख,शंभूराज बाणखेले, आयुष दिलीप जाधव,मंथन अमर ढेरेंगे,मयंक अमर ढेरेंगे,सर्वज्ञ रविंद्र खानदेशे छोटा गट (मुली)- १२ वर्षापर्यंत तन्वी सचिन महाबारे, स्वरा तुषार लोंढे,कल्याणी नीलेश शिंदे,भार्गवी देवेंद्र बाणखेले , स्नेहा राजेश पांडे,समृद्धी राजू जाधव या स्पर्धे साठी रक्कम स्वरूपात विजेत्या स्पर्धकांना पैसे मेडल आणि ट्रॉफी देण्यात आले.या स्पर्धेचे आयोजन भारतीय जनता पार्टी पुणे उपजिल्हाध्यक्ष धनेशजी बाणखेले यांनी केले त्यांच्या समवेत अवधूत बाणखेले मनोज लोखंडे,हेमंत चासकर,अक्षय चासकर,अमोल बेंडे,तुषार म्हस्के,श्रीराम थोरात,सागर पिंगळे,आनंद थोरात,महेश हरिहर,माऊली लोखंडे,संतोष पवार,सचिन बाणखेले,अनिल डोकडे, विश्वजित तासगावकर,सुशांत रोकडे,राजु ढेरेंगे,रिझवान इनामदार, ताहीर खान,अमीर अली अझर इनामदार साहिल सय्यद, स्वप्नील लोखंडे,बाबू गोरे,राहुल वरे, अक्षय बांगर,किरण बाणखेले,रामशेठ वीर बक्षिस वितरण जनसेवक श्री संजय भाऊ थोरात,धनेश भाऊ बाणखेले, सुदर्शन माताडे,योगेश बाणखेले, मंचर पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार गणपत डावखर साहेब,अशोक गुंजाळ,किरण महाजन, जागृतीताई महाजन, संध्याताई बाणखेले,पोंगाडे सर,दत्ता चासकर सर यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

उरणमध्ये शिवसेनेच्या नव्या नेतृत्वाखाली पहिली बैठक यशस्वीरीत्या संपन्न

दै, जनप्रभात उरण ता. प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : उरणमध्ये नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख आणि तालुका प्रमुख यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेची बैठक यशस्वीरीत्या पार पडली. या बैठकीत पक्षबांधणी, संघटनात्मक बळकटी आणि भविष्यातील कार्यपद्धती यावर सखोल चर्चा झाली.बैठकीच्या सुरुवातीला संत तुकाराम महाराज यांना अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर, मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर झालेल्या प्रतिष्ठित पुरस्काराबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडून टाळ्यांच्या गजरात शुभेच्छा देण्यात आल्या.या प्रसंगी नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख अतुल भगत,नवनिर्वाचित तालुका प्रमुख दिपक ठाकूर तसेच उरण विधानसभा संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे,उरण तालुका संघटक चंद्रकांत पाटील,विधानसभा सहसंघटक निखिल पाटील, विधानसभा सह संपर्कप्रमुख प्रितम पाटील,उपतालुका प्रमुख अमित ठाकूर,पनवेल ग्रामीण तालुका प्रमुख बाळा नाईक, चाणजे विभाग प्रमुख अक्षय म्हात्रे, नवघर विभाग प्रमुख गणेश घरत, उरण तालुका महिला आघाडी उपाध्यक्ष तृप्ती घरत,रवींद्र म्हात्रे,सुनील भोईर, दिपक माळी,संजय घरत,महेंद्र घरत,भावेश भोईर,संजीव कुमार,संदीप ठाकूर,हर्षल ठाकूर तसेच अनेक शिवसैनिक पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीत उरण मधील शिवसेना आणखी मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन पक्षासाठी समर्पितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.शिवसेना बळकट करण्यासाठी नव्या जिल्हा आणि तालुका प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

श्रीक्षेत्र साहूर हे जागतिक स्तरावरील क्रांतिकारी गाव : श्रीराम ढोबळे
१७९ स्पर्धकांनी रंगविले रंगविना व्यसनमुक्त होळी-धुलीवंदन

साहूर ■ शरद वरकड



साहुर : केवळ राज्यात किंवा देशातच नव्हे तर जागतिक पातळीवर एक क्रांतिकारी गाव म्हणून कीर्ती मिळवणारे श्रीक्षेत्र साहूर हे आहे. कारण याच गावातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ नामकरणाचा लढा सुरू झाला व त्यासाठी रमेशचंद्र सरोदे हे अखेरपर्यंत प्राणपणाने लढले. हा इतिहास कुणीही बदलू शकत नाही. या अविस्मरणीय लढ्याचा एक सत्याग्रही म्हणून मी स्वतः साक्षीदार आहे असे गौरोद्गार प्रा.श्रीराम ढोबळे यांनी सत्काराला उत्तर देताना काढले.

श्रीक्षेत्र साहूर येथे दि.१४ मार्च २०२५ ला आदर्श होळी - धुलीवंदन महोत्सवात ते बोलत होते. गेल्या १५ वर्षापासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ नामकरणाचे शिल्पकार रमेशचंद्र सरोदे हे या महोत्सवाचे आयोजन करीत आहे. दारूच्या व्यसनामुळे येथील अनेक घरे उद्ध्वस्त झाली आहे .अनेक तरुण मृत्यूच्या दारात उभे आहे. भावी पिढी तरी वाचावी म्हणून अनेक सुधारक मंडळी आता एकत्र येऊन रंगविना व व्यसनमुक्त होळी धुलीवंदन सोहळा साजरा करण्यासाठी पुढे सरसावले आहे.याप्रसंगी हास्यसंम्राट लोकशाहीर नारायणदास पडोळे महाराज यांनी पंचरंगी कीर्तनातून हास्याची उधळण करीत प्रबोधन केले

११ सत्कारमूर्तींचा सन्मान

इंजि. माधवी निलेश दंडाळे पुणे,प्रा. श्रीराम ढोबळे नागपूर, माजी प्राचार्य हरिभाऊ वानखडे वरूड, विवेकदादा लाड सावनेर, वसंतदास ढवळे आष्टी, माजी सरपंच दामोदरजी गावंडे व मरणोत्तर स्व.कुसुमताई गावंडे, माजी मुख्या. धनराज तुपकर, नामदेव बाळोकार, रघुनाथजी गोंधळे, प्रभाकरजी भोरे, सितारामजी कांदे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

स्व.मयूर भोरे स्मृती स्पर्धा स.९ ते १२ पर्यंत वेशभूषा स्पर्धा-८० स्पर्धक , सुंदर हस्ताक्षर स्पर्धा-६२ स्पर्धक,गीत गायन स्पर्धा -३७ स्पर्धक याद्वारे भरगच्च कार्यक्रम घेण्यात आला. वेळेअभावी कराओके गायन स्पर्धा घेता आली नाही. स्पर्धांचे परीक्षण मिलिटरी स्कूल पुलगाव चे सुधीर वाघ ,शरद वरकड, विवेक लाड ,ज्ञानेश्वर भोरे ,विवेक ढोरे यांनी केले.

प्रमुख मान्यवरांची उपस्थिती

याप्रसंगी ईश्वर वरकड माजी सभापती पं.स.आष्टी, गजानन सरोदे नागपूर, प्रा. विनोद पेठे ,किशोर शेंडे नायब तहसीलदार नागपूर, रेखा शेंडे, मोहनदास राठी ,गुणवंत राऊत, दीपक खरडे यांची प्रमुख उपस्थिती होती .यावेळी स्व. मयूरदादा भोरे यांचे सह मागील एक वर्षात ज्यांचे ज्यांचे निधन झाले त्या सर्वांना मौन-श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .कार्यक्रमाचे व्यवस्थापन चेतन भोरे, काशिनाथजी गोंधळे वर्धा ,हरिभाऊ टाकळकर वर्धा, अंजली मनोज बोंदरे ,आकाश पाटमासे, गजानन करडे यांनी व सूत्रसंचालन गायत्री घोटकर, आभार कल्याणी खिरटकर यांनी केले. राष्ट्रवंदने कार्यक्रमाची सांगता झाली.

शालिनी आनंद सक्सेना यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले २०२२-२३ च्या पुरस्काराने सन्मानित

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : महिला सक्षमीकरण स्त्री शिक्षण पददलितांचे शिक्षण सामाजिक परिवर्तन स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध आणि वंचित महिलांसाठी कार्य करणाऱ्या महिलांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची घोषणा उच्चव तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केली होती. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनासाठी दिलेले योगदान लक्षात घेऊन हा पुरस्कार सुरू करण्यात आला होता. समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या गौरव करून त्यांना प्रेरणा देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार सौ. शालिनी आनंद सक्सेना यांना १० मार्च रोजी, स्व. सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्ताने प्रदान करण्यात आला.

सन २०२२- २३ या वर्षासाठी शासन स्तरावरील निवड समितीने या पुरस्कारांसाठी मान्यता दिली. नागपूरच्या सौ. शालिनी सक्सेना हिला चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभ हस्ते गौरविण्यात आले. हा पुरस्कार मुंबईत देण्यात आला. यावेळी जेष्ठ पार्श्वगायिका तथा पद्मश्री अनुराधा पौडवाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, छगन भुजबळ, वेणुगोपाल रेड्डी, उज्वला चक्रदेव, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, डॉ. विलास नांदवडेकर कुलसचिव आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई उपस्थिती होते.

पंतप्रधान इंटरर्शीप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : केंद्रीय अर्थसंकल्पात पंतप्रधान रोजगार आणि कौशल्य विकास योजनेंतर्गत 'पंतप्रधान इंटर्शीप योजनेची' घोषणा केलेली आहे. ही योजना पुढील पाच वर्षाकरिता ६३ हजार कोटी इतक्या अंदाजित खर्चासह देशातील महत्वाच्या ५०० कंपन्यामध्ये तरुणांना इंटर्शीपच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पात्र उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करावी असे, आवाहन करण्यात आले आहे.

सदर योजना भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणार असून. पुढील पाच वर्षात एक कोटी तरुणांना रोजगारक्षम बनविण्यासाठी देशातील सर्वोच्च ५०० कंपन्यामध्ये युवकांना इंटर्शीप संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे..

या कंपन्या कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत कॉर्पोरेट सोशल रीस्पोन्सीबिलीटी (एसें) उपक्रमामध्ये सहभागी असणे आवश्यक आहे. प्रत्येक इंटर्नसाठी वार्षिक ६६ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. दरमहा ५ हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. यामध्ये सदर कंपनी त्यांच्या एसें निधीमधून ५०० रुपये उमेदवारास देईल आणि केंद्र शासनाकडून ४ हजार ५०० रुपये मानधन उमेदवारास देण्यात येणार आहे. हे मानधन ऊँऊ द्वारे उमेदवाराच्या खात्यात थेट हस्तांतरित करण्यात येईल. भारत सरकार प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत उमेदवारास विमा कवच उपलब्ध करून दिल्या जाणारआहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पूर्णवेळ शिक्षण घेत असलेले किंवा नोकरी करत असलेले उमेदवार पात्र असणार नाही. उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ रुपयापेक्षा जास्त नसावे किंवा कुटुंबातील कोणतेही सदस्य सरकारी नोकरीत नसावे. उमेदवाराचे वय २१ ते २४ वर्ष असणे आवश्यक आहे. यासाठी उमेदवार

पूज्ेः//ज्स्ह्ीपज.र्सें.दन.ग्ह या संकेतस्थळावर नोंदणी करू शकतात. या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करू शकतात. पंतप्रधान इंटर्शीप योजनेत वर्धा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने कळविण्यात आले आहे.

भंडाऱ्यातील वाळू तस्करीची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी ; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन

मुंबई ■ दिलीप येवले

दोषींचे सीडीआर तपासणार;सात दिवसांत चौकशी अहवाल

मुंबई : भंडारा जिल्ह्यातील वाळू तस्करी रोखण्यासाठी शासनाकडून कठोर पाऊल उचलले जात असून यामध्ये सहभागी अधिकाऱ्यांची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करुन कारवाई करण्याचे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. दोषी अधिकाऱ्यांचे सीडीआर काढून सात दिवसांत चौकशी करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा खोऱ्यात होणाऱ्या वाळू तस्करीबद्दल आ. नाना पटोले यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

बावनकुळे म्हणाले, स्थानिक आमदारांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. या कारवाईत पोलिसांची मदत घेतली जात आहे. जेवढे अधिकार महसूल विभागाला आहेत तेवढे अधिकारी पोलिसांना देण्याबाबत नवीन वाळू धोरणात विचार करत आहोत. अवैध रेती उत्खनन रोखण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. याकामी गृह विभागाची मदत घेतली जात आहे.

अपघातग्रस्त कुटुंबाला अधिकाधिक मदत

अवैध वाळू तस्करी करणाऱ्यावर कारवाई करत शासनाने २५ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. दरम्यान डंपर अपघातात मृत्युमुखी पडलेल्या मुलीच्या कुटुंबियांना १५ लाखांपर्यंत मदत केली जाईल. तसेच वीर महावाडे या हात गमावावा लागलेल्या तरुणाला विशेष बाब म्हणून मुख्यमंत्र्यांकडून मदत करू असेही बावनकुळे म्हणाले.

राष्ट्रीय लोकअदालत २२ मार्चला

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाचे अनुषंगाने जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा तसेच हिंगणघाट, पुलगांव, आर्वी, आष्टी, कारंजा (घा.), सेलु, समुद्रपूर, येथील तालुका न्यायालयांमध्ये २२ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये न्यायालयातील प्रलंबीत तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, १३८ परिकाम्य लेख अधिनियम ची प्रकरणे, भुसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, एम. एस. ई. बी. प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, ग्राहक तकार न्याय निवारण प्रकरणे, न्यायालयातील प्ररकणे, न्यायालयातील बँकेशी संबंधीत प्रलंबीत प्रकरणे, तसेच वाद दाखल पूर्व प्रकरणांमध्ये टेलिफोन / मोबाईल कंपनीसंबंधीत, राष्ट्रीयकृत बँक, पंतसस्था ग्रामपंचायत बँकेशी संबंधीत प्रकरणे वाद दाखल पूर्व प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतसमोर ठेवण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयातील तडजोडीस पात्र प्रलंबीत तसेच वाद दाखल पूर्व प्रकरणे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने आपसी तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहे. पक्षकार, अधिवक्ता तसेच नागरिकांनी २२ मार्च २०२५ रोजी आयोजीत राष्ट्रीय लोक अदालत समोर मोठया प्रमाणात प्रकरणे ठेवून आपसी तडजोडीने निकाली काढावीत असे आवाहन संजय जु. भारूका, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा तसेच एस. ए. एस. एम. अली, जिल्हा न्यायाधीश तथा अति सत्र न्यायाधीश, वर्धा यांनी केलेले आहे.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये पक्षकारांना आपली बाजु मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड पक्षकारांच्या आपसी सहमतीने होते त्यामुळे राष्ट्रीय लोक अदालतमध्ये झालेल्या न्यायनिवाडयाचे / तडजोडीचे समाधान दोन्ही पक्षकारांना असते. त्यामुळे पक्षकारांनी २२ मार्च २०२५ रोजी आयोजीत राष्ट्रीय लोक अदालतमध्ये मोठया प्रमाणामध्ये प्रकरणे तडजोडीकरीता ठेवावीत असे आवाहन जे. ए. पेडगावकर, जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच विवेक डी. देशमुख, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,

गौळ येथे शिवाजी महाराज जंयती उत्साहात

गौळ ■ योगेश कांबळे



गौळ : येथील आठवडी बाजारातील शिवसेना चौकात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. या वेळेस छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. व भगव्या झेंडा व ध्वजाची पुजा करण्यात आली. यावेळेस शिवाजी महाराज यांनी केलेल्या पराक्रमा बाबत गणेश जाधव यांनी माहीती दिली.व छत्रपती महाराज यांच्या विचारावर तरूण युवकांनी चालण्याचे आवाहन यावेळेस करण्यात आले.

कार्यक्रमाला उच्च प्राथमिक शाळेतील मुख्यधापक रमेश हजारे शिक्षक प्रदिप देशमुख,यशवंत गोबाडे ,गणेश जाधव , अमोल नासरे प्राथमिक आरोग्य केंद्र गौळ येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.शेळके पोलीस पाटिल अरविंद कांबळे, पत्रकार योगेश काबंळे भाजपा युवा मोर्चा देवळी ग्रामीण महामंत्री अक्षय नामदार संदिप लोणारे ,मंगेश नामदार,समीर सारजे, मनोहर कोकांडे,दिलीप नामदार ,रामा बोडके, नारायण ऊईके, गजानन बोंडे, साहिल वानखेडे,पवन नामदार,रामा नागपूरे,अमोल ईरपाते,नयन अड्डे,राम लोणारे सह गावातील नागरिक उपस्थित होते.

शिवसेना शिंदे गटाचे वतीने सेलूत शिवजयंती साजरी



सेलू ■ प्रशांत झाडे

सेलू : येथील विकास चौकात शिवसेना शिंदे गटाचे वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम शिवाजी महाराज यांच्या फोटो चे विधिवत पूजन शिवसेना जिल्हा प्रमुख राजेंद्र सराफ, माजी जिल्हा प्रमुख अनिल देवतारे, सेलू नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष स्नेहल देवतारे, नगरसेवक शैलैंद्र दप्तरी,रूक्सार पठाण, ठाणेदार मनोज गभणे, सुनील पारसे यांनी केले. सदर कार्यक्रम प्रसंगी ग्रामस्तान करिता थंड पेय मठ्ठा , केळी , टरबूज आदीचे वाटप करण्यात आले यावेळी राऊत, तालुका प्रमुख रोशन कोंबे, शहर प्रमुख प्रशांत झाडे,उपतालुका प्रमुख पंकज तडस, शेतकरी संघटना तालुका प्रमुख रोहीत सुपारे, गौरव धानकुटे, प्रविण सोनटक्के, संदीप बर्डे, शिवसेना पदाधिकारी तथा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

पं. श्रीधर पार्सेकर व पं. विष्णुपंत कावळे स्मृती संगीत समारोह उत्साहात संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : श्री गुरुदेव सेवा मंडळ येथे ९ मार्च रोजी, पं.श्रीधर पार्सेकर व पं.विष्णुपंत कावळे स्मृती प्रीत्यर्थ आयोजित ५८ वा, संगीत समारोह उत्साहात पार पडला. प्रथम सत्रात आयोजक प्रवीण कावळे व शिष्य वर्गाचे व्हायोलिन झाले. 'जय शारदे वागीश्वरी', राग जयजयवंती व भैरवीचे सादरीकरण करण्यात आले. तद्नंतर प्रवीण कावळे यांचे एकल व्हायोलिन वादन झाले. त्यांनी व्हायोलीनवर राग पुरिया धनाश्रीचे बहारदार सादरीकरण केले. देश या रागावर आधारित धून वाजवून त्यांनी श्रोत्यांची मने जिंकली. या नंतर अकोल्याचे प्रख्यात गायक किशोर देशमुख यांचे सुश्राव्य गायन झाले. त्यांनी राग शाम कल्याण मधील ख्याल, कलावती रागातील तराना व 'बाजे मुरलिया बाजे' या भजनाचे उत्तम सादरीकरण केले. अंतिम सत्रात कोलकात्याचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्हायोलीन वादक पं.इंद्रदीप घोष यांचे व्हायोलिन वादन झाले.

पं. घोष यांनी सुरवातीला विओला या वाद्यावर राग चंद्रनंदन सादर करून प्रेक्षकांची वाह वाह मिळवली. व्हायोलीन वरील पहाडी -झिंझोटी या जोड रागाचे वादनातून मैफिलित अद्वितीय रंग भरले. तसेच रागमाला वाजवून विविध रागांचे अवर्णनीय पैलू उलगडत त्यांनी राग भैरवीने शेवट केला. कलाकारांना राम खडसे, सिद्धेश्वर टिकार यांची तबल्यावर तसेच डॉ. हर्षवर्धन मानकर यांची संवादिनी वर उत्तम साथ लाभली. कार्यक्रमाचे संचालन कु.अनुष्खा कावळे यांनी केले. या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शाळेत भरला बाजार गिऱ्हाईक दोन हजार

काटोल ■ प्रशांत पवार



काटोलः जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिष्णूर येथे दि. १२ मार्च २०२५ सायंकाळी सहा ते नऊ या वेळात बालआनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना देवाणघेवाण व्यवहार तसेच स्वतः केलेल्या कामाचा आनंद प्रत्यक्ष व सहज घेता यावा व घेतलेल्या ज्ञानाचे उपयोजन होण्याच्या दृष्टीने भिष्णूर शाळेत बालआनंद मेळाव्याचे आयोजन केले होते. भविष्यातील व्यावसाईक घडविण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ विक्रीस ठेवले. विविध प्रकारचे एकंदरीत ५० खाद्यपदार्थांचे स्टॉल इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी लावले होते. भिष्णूरवासीयांचा देखील मेळाव्याला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. गावातील दोन हजारापेक्षाही जास्त लोकांनी मुलांच्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. शाळेच्या परिसरात पाय ठेवायलाही जागा नव्हती इतकी प्रचंड गर्दी झाली होती. जणू काही नागपूरचे सिताबर्डी मार्केट शाळेच्या प्रांगणात उतरले होते. एवढी गर्दी असूनही छोटे छोटे दुकानदार अतिशय शिस्तबद्धरित्या आपले दुकान एखाद्या सराईत दुकानदाराप्रमाणे सांभाळत होते. मोलभाव करणाऱ्या ग्राहकांना शांतपणे भाव समजावून सांगत होते व वस्तूचे वितरण करत होते. प्रत्येक स्टॉलवर आपआपली स्वतंत्र कचरा पेटी होती. कुणीही कचरा इतरत्र टाकू नये असा आग्रह मुले आपल्या ग्राहकांना करत होती. जवळपास ५० ते ६० हजार रुपयांची आर्थिक उलाढाल या बाजारात या चिमुकल्या दुकानदारांनी घडवून आणली. या छोट्या छोट्या विद्यार्थ्यांमध्ये भविष्यातील मोठे उद्योजक दडलेले आहेत हे पाहून पालकांना समाधान वाटले.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री नरेंद्र बोढाळे सर ज्येष्ठ शिक्षण विस्तार पंचायत समिती काटोल यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ कोमल ताई रेवतकर अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती भिष्णूर या होत्या, प्रमुख अतिथी म्हणून भिष्णूर नगरीच्या सरपंच सौ. लताताई बागडे उपस्थित होत्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्याकरता उपसरपंच श्री नरेंद्रजी नासरे , ग्रामपंचायत सदस्य श्री तुळशीदासजी वानखेडे,श्री मनोज भाऊ नासरे, श्री मनोजराव फुले,श्री अरुणकुमार बांबल, सौ.सुवर्णाताई रेवतकर, आ. पुनमताई रेवतकर, सौ.सुरेखाताई धोटे, सौ.योगिताताई नासरे, सौ.सुनंदाताई तागडे.... व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री मनोहर कळंभे, श्री श्रावणजी ढबाले से. प्राचार्य गुरुस्मृती विद्यालय भिष्णूर, शा.व्य.स. सदस्य श्री गजानन कळंभे, श्री प्रफुल वंजारी, श्री संजय रेवतकर, श्री संजय रेवतकर,श्री मोहन आहाके , सौ. अल्काताई रेवतकर, सौ.सविताताई खडसे, सौ. तनुश्रीताई सुरजुसे, सौ. प्रितीताई आगरकर, सौ. सुनीताताई रेवतकर , भिष्णूर येथील रायझिंग स्टार कॉन्व्हेंट च्या मुख्याध्यापिका सौ. नासरे मॅडम, पोलीस पाटील सौ. चेतनाताई आगरकर,आ.श्री सागर टुले (कोतवाल)इत्यादी मान्यवर व मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. श्री प्रविण भैस्वार, श्री विनोद मुसळे, श्री माणिक नाईक, श्री कमलेश सोनकुसळे सर व सौ. सोनकुसळे मॅडम, श्री हेमराज कळंभे, श्री लोकपाल टुले,श्री सुनील कळंभे, श्री नितीन वराडे, श्री मनोज ठाकरे इत्यादी परिसरातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ संगीताताई नंदनवार प्रास्ताविक श्री तुषार चरडे,आभार प्रदर्शन श्री रघुनाथ धवड यांनी केले. आ. कु. इंदिराताई तांदळे मॅडम, आ. सौ.वृशालीताई तायवाडे मॅडम, आ. श्री विठ्ठल भाऊ वरुडकर (स्वयंपाकी), कु. प्रतीक्षाताई भिसे (स्व.से) आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'पोरवाल महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती प्रसंगी खेडाळूंचा सत्कार'

कामठी ■ दिलीप येवले



कामठी, दिलीप येवले : स्थानिक सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि खेळ व मनोरंजन विभागांच्या संयुक्त विद्यमाने तर्फे महाविद्यालयाच्या ग्रंथालय कक्षात तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या छायाचित्राला माल्यार्पण, दीपप्रज्वलन, शिव गर्जना आणि महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात इतिहास विभाग प्रमुख व समन्वयक डॉ.जितेंद्र सावजी तागडे यांनी कार्यक्रमाचा उद्देश्य स्पष्ट करतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शारीरीक तालीमिंचा धावता आढावा घेतला. खेळ व मनोरंजन विभागाचे सहयोगी व प्राध्यापक व इतिहास अभ्यास मंडळाचे सल्लागार डॉ. जयंत रामटेके यांनी बॉक्सिंग व रस्साखेच स्पर्धेत त्यांच्या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे कौतुक करत यश संपादन करण्यासाठी कठीण परिश्रम घेण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रम अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्यात प्रजा जशी गुण्यागोविंदाने नांदत होती तसेच बंधुभावाने राहण्याचे आव्हान केले. यावेळी राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ स्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत निवड झाल्याबद्दल संध्या शरणागत व सिमरन धुर्वे तर रस्साखेच स्पर्धेत सरफराज अंसारी व प्राची देवधगले यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल आणि आंतर महाविद्यालयीन रस्साखेच स्पर्धेत पुरुष व महिला टीम ने तृत्रीय क्रमांक पटकाविल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचे स्मृति चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. मनीष चक्रवर्ती, सी.डी.सी. सदस्य डॉ. स्वप्नील दहात, डॉ. प्रशांत बाम्बल, डॉ. यशवंत मेश्राम, डॉ. सिद्धार्थ मेश्राम, डॉ. इंद्रजीत बसू , डॉ. महेश जोगी, डॉ. विकास कामडी, प्रा. धम्मदिना बोरकर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बहुसंख्येने इतिहास विषयाचे विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्वल सौलंकी, तर आभार मितेश चहांदे यांनी मानले.

सर्वसामान्यांना न्यायाच्या कक्षेत आणण्यासाठी शासकीय योजनांचा महामेळावा महत्वाचा : न्यायमूर्ती नितीन सांबरे

पारडसिंगा येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यास नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

न्याय सर्वांसाठी या भूमिकेतून प्रत्येकाने कर्तव्य तत्पर राहण्याची आवश्यकता : न्यायमूर्ती अभय मंत्री

विविध विभागाच्या ४० स्टॉल मार्फत शासकीय योजनांचा जागर





काटोल ■ प्रशांत पवार

काटोल;समाजातील वंचित घटकांसाठी असलेल्या योजना प्रभावीपणे पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. सर्वांना न्यायाची व प्रशासन आपल्या दारी आल्याची अनुभूती या शासकीय योजनांच्या महामेळाव्यातून प्रत्येकाला घेता येणे शक्य झाले आहे. आज विविध विभागांच्या ४० स्टॉल्सच्या माध्यमातून अनेक पात्र लाभार्थ्यांनी शासकीय योजनांच्या लाभांसह हा विश्वास येथून घेतल्याचे समाधान असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायाधीश तथा मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे पालक न्यायमूर्ती नितीन डब्ल्यु. सांबरे यांनी केले.

पारडसिंगा येथील श्री सती अनुसया माता मंदिर परिसरात आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळावा उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूरचे न्यायाधीश तथा नागपूर जिल्हा पालक न्यायमूर्ती अभय जे. मंत्री, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष दिनेश पी. सुराणा, आमदार चरणसिंग ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती नागपूर खंडपीठाचे सचिव अनिलकुमार शर्मा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सचिन स. पाटील, काटोल येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर एम. झेड. ए. ए. क्यु. कुरैशी व मान्यवर उपस्थित होते.

शासनाचे विविध विभाग व जिल्हा प्रशासन सर्व सामान्यांना शासकीय योजनांच्या माध्यमातून न्याय देण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहे ही आनंदाची बाब आहे. जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये विशेष शिबीरे घेऊन त्यांना आवश्यक असणाऱ्या जात प्रमाणपत्रांपासून रहिवासी प्रमाणपत्रांपर्यंतचा लाभ दिल्याबद्दल न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांचे कौतुक केले. ग्रामीण भागात स्वयंरोजगाराला चालना देणाऱ्या व जून्या कौशल्याच्या जपणूकीसह यात वृध्दी घालणाऱ्या हातमाग, हँडल्यूम क्षेत्राचा त्यांनी विशेष उल्लेख केला. अशा क्षेत्रांच्या पुनर्रजीवनासाठी सुरु असलेले प्रयत्न महत्वाचे आहे, असे न्यायमूर्ती नितीन सांबरे म्हणाले.

ग्रामीण भागातून अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले युवक आज शेतीसाठी, नवतंत्रज्ञानासाठी स्वःताला झोकून देत आहेत. त्यांनी ठरविले असते तर बाहेर महानगरात त्यांना सहज नोकऱ्या उपलब्ध आहेत. असे असूनही कृषी क्षेत्रात ड्रोनसारख्या तंत्रज्ञानासाठी युवा पिढी पुढे येत आहे याबद्दल त्यांनी युवा अभियंत्यांचा गौरव केला.

पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न आवश्यक- न्यायमूर्ती अभय मंत्री

या मेळाव्यामध्ये एक सकारात्मक ऊर्जा आपण सर्वजण अनुभवत आहोत. केंद्र व राज्य शासनाच्या योजना तळागाळात पोहचाव्यात याचा प्रातिनिधीक संदेश या महामेळाव्यातून आपण दिलेला आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी ज्यांच्यासाठी योजना साकारल्या आहेत त्या गरजु पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत, असे आवाहन न्यायमूर्ती अभय मंत्री यांनी केले. शासकीय योजनांच्या लाभासाठी तालुका पातळीवर जिल्हा प्रशासनातर्फे लहान मोठे शिबीरे, कॅम्पमार्फत प्रशासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

गावागावात शासकीय योजनांच्या कॅम्प माध्यमातून पन्नास दिवसात १२ हजार प्रमाणपत्रांचे वितरण - जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर

जिल्हा प्रशासन हे लोक कल्याणकारी राज्याच्या भूमिकेत 'किमान शासन व अधिक सुराज्य' या भावनेतून कार्यरत आहे. जिल्ह्यातील ७० महसूल मंडळांतर्गत सर्व गावांपर्यंत विविध योजना पोहचाव्या यासाठी आम्ही प्रयत्नरत आहोत. १०० दिवसांच्या उपक्रमांतर्गत ५० दिवसातच जिल्ह्यातील १२ हजार विद्यार्थ्यांना त्यांना आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व इतर महसूल प्रमाणपत्र प्रशासनाने दिले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले. प्रत्येक गावात जाऊन आम्ही कॅम्प घेत असून ई-गव्हर्नन्स व ई-नझूल उपक्रमाच्या माध्यमातून पारदर्शी प्रशासनाचा प्रत्यय आम्हाला देता येणे शक्य झाले आहे. कोणत्याही शासकीय योजनांसाठी कसल्याही प्रकारचे एजंट असता कामा नयेत ही भूमिका घेऊन जिल्हा प्रशासन काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांना लवकरच घरी बसून आता प्रमाणपत्र कोणत्याही मध्यस्थाशिवाय घेणे शक्य झाल्याचे ते म्हणाले.

प्रत्येकाच्या हक्कासाठी सर्वांची दक्षता महत्वाची- प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश पी. सुराणा

कोणताही व्यक्ती न्यायापासून वंचित राहू नये ही सर्वांची भूमिका आहे. एकमेकांच्या हक्कासाठी समाजातूनही जागरुकता आवश्यक असून योजना या आपणच आपल्यासाठी तयार केलेल्या आहेत अशी लोकशाहीत्वाची धारणा मोठ्या प्रमाणात वाढण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश पी. सुराणा यांनी केले.

यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर यांनी आपल्या मनोगतात वन विभागातील गावांमध्ये जनसुविधा पोहचविण्यासाठी अधिक सुलभता असावी, अशा भावना व्यक्त केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी जिल्हा परिषदेतर्फे राबविल्या जात असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

सुशिला बाई खडसे आजींना न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी दिले दहावी उत्तीर्णचे प्रमाणपत्र

या कार्यक्रमात शासकीय योजनांचा पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात लाभ देण्यात आला. यात सर्वांचे लक्ष वेधून घेतले ते सुशिला खडसे या आजींनी! नवभारत साक्षरता अंतर्गत सुशिलाबाई यांनी वयाचे कोणतेही अंतर मनात येऊ न देता दहावीची परीक्षा दिली. या परीक्षेत त्या उत्तीर्ण झाल्या. न्यायमूर्ती नितीन सांबरे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात त्यांना व इंदूबाई सायरे यांना उत्तीर्ण प्रमाणपत्र देण्यात आले.

याचबरोबर दिव्यांगांना तीनचाकी सायकल, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्रतिवर्ष १२ हजार रुपये प्रमाणे लाभ वाटप, शिक्षणाचा हक्क अंतर्गत प्रवेश कार्ड, बिरसा मुंडा कृषीक्रांती योजनेंतर्गत विहिर दुरुस्तीसाठी १ लक्ष रुपये, पंपसंच व पीव्हीसी पाईप, समाज कल्याण विभागांतर्गत झेरॉक्स मशिन, दिव्यांग घरकुल, संगणक प्रशिक्षण, पंचायत समिती अंतर्गत पट्टे वाटप, कृषी विभागांतर्गत ड्रोन, रोटावेटर, पॉवर विडर, ठिबक, ट्रक्टर आदी साहित्यांचे प्रातिनिधीक वाटप करण्यात आले. वन विभाग, महाराष्ट्र विद्युत वितरण, आरोग्य विभाग नगर परिषद, महिला व बालविकास विभाग, राष्ट्रीय पशुधन अभियान, विशेष घटक योजना, मनरेगा आदी योजनांच्या निवडक लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात लाभाचे यावेळी वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागपूरच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी गौरी जांगडे देशपांडे व वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश प्रितेश चंद्रशेखर देशपांडे यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सचिन स. पाटील यांनी आभार व्यक्त केले. सर्व मान्यवरांनी विविध स्टॉल्सला भेटी देऊन संबंधित शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांशी चर्चा केली.

यावेळी नव्या भारताचे नवे कायदे - भारतीय न्याय संहिता २०२३ या विषयावर मल्टीमिडीया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन न्यायमूर्ती नितीन सांबरे व मान्यवरांनी केले. नागपूरचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत यांनी मान्यवरांना प्रदर्शनाबाबत माहिती दिली.

दोन दुचाकीची अमोरासमोर धडक दोन जण गंभीर ;भर जहागीर बस स्टॉप वरची घटना

वाशिम ■ प्रतिनिधी



रिसोड : दोन दुचाकीची आमोरासमोर धडक होऊन यामध्ये दोघेजण गंभीर रित्या जखमी झाल्याची घटना दिनांक १६ मार्चरोजी रात्री ९:१५ वाजता रिसोड लोणार मार्गावर ग्राम भर जहागीर बस स्टॉप वर घडली. शेख तबरेस शेख हरून वय २६ वर्षे राहणार रिसोड व नवनाथ फकीरा गुंजाळ राहणार सावरखेड तेजन ता. सिंदखेड राजा जी बुलढाणा असे जखमीचे नावे असून स्थानिक नागरिकांनी दोन्हीही जखमींना ?म्बुलन्स द्वारे रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ भरती केले. या ठिकाणी जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने दोघांनाही वाशीम येथे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले आहे. याबाबत माहिती अशी की रिसोड येथील शेख तबरेज हे आपल्या एका अन्य मित्रासह आपल्या दुचाकीने लोणार कडून रिसोडच्या दिशेने आपले घराकडे येत असताना समोरून येत असलेल्या नवनाथ गुंजाळ हे आपल्या एका अन्य मित्रासह आपल्या गावाकडे जात असतांना दोघांच्या दुचाकीची भर जहागीर जवळ धडक झाली. धडक एवढी जबर होती की दोघांच्याही डोक्याला गंभीर मार लागला तर दोघांच्याही दुचाकी वर त्यांच्यासोबत असलेल्या अन्य मित्रांना मात्र किरकोळ मार लागला अशी माहिती स्थानिक नागरिकांकडून मिळाली. घटनेची माहिती मिळताच भर जहागीर येथील बस स्टॉप वर असलेल्या नागरिकांनी घटनास्थळ कडे धाव घेत ?म्बुलन्स बोलवून त्यांना रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात भरती केले. जखमींचे नातेवाईकांनी रिसोड ग्रामीण रुग्णालय येथे एकच गर्दी केली. दोघांच्याही डोक्याला जबर मार असल्याकारणाने डॉक्टरांनी त्यांचा प्राथमिक उपचार करून पुढील उपचारा करिता वाशीम येथे पाठविण्यात आले आहे.

अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविले

वाशिम ■ प्रतिनिधी

रिसोड : तालुक्यातील एका गावातून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवल्याची घटना दिनांक १६ मार्च रोजी घडली. आकाश प्रकाश फुपाटे असे आरोपीचे नाव असून रिसोड पोलिसांनी त्याच्या विरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल कर केला आहे. याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने रिसोड पोलीसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांची १६ वर्षीय मुलीला गावातीलच एका आकाश फुफाटे नावाच्या युवकाने तिला फूस लावून पळून नेले आहे. याप्रकरणी रिसोड पोलिसांनी कलम १३७ (२)नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नागरे करीत आहेत.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांची जिल्हा परिषद शाळा काटा क्रमांक २ ला भेट

विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे कौतुक; शिक्षकांच्या कलाकृतींना दाद

वाशिम ■ प्रतिनिधी



वाशिम : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी सोमवार, १७ मार्च रोजी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा काटा क्रमांक २ ला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना मराठी वाचन, इंग्रजी वाचन तसेच संख्यावरील गणिती क्रियांबाबत प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली, यावर जिल्हाधिकारी यांनी त्यांचे भरभरून कौतुक केले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली ग्रीटिंग्स पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. तसेच शाळेचे मुख्याध्यापक गजानन गायकवाड यांनी सुंदर फलक लेखन आणि स्वतः तयार केलेली राजमाता जिजाऊंची पेंटिंग जिल्हाधिकारी यांना भेट म्हणून दिली. याबद्दल त्यांनी मुख्याध्यापक गजानन गायकवाड आणि शिक्षिका चंदा खंदारे (गायकवाड) यांचे विशेष अभिनंदन केले. या कार्यक्रमास नायब तहसीलदार प्रतिभा चौधरी, माजी पंचायत समिती सभापती विरेंद्र देशमुख, सरपंच जयाताई रामकिसन मोरे, मंडळ अधिकारी आशा आदबाणे, ग्रामसेवक एस. पी. राठोड, ग्रामसेवक संतोष घोडके, तलाठी सुलभा दुरटकर, कृषी सहाय्यक राजेश छत्रे, पुनम गावंडे, माधुरी बांगर तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणीअभावी जंगलातील पाणवठे कोरडे - वन्यप्राण्यांचे गावाकडे धावण्याचे सत्र सुरू : वनविभागाचे मात्र या गंभीर विषय दुर्लक्ष

आर्णी ■ प्रतिनिधी

फुलंब्री : येथे पिण्याच्या पाण्यासाठी वानरांना अशा पद्धतीने कसरत करून तहान भागवावी लागत आहे.

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेने जंगलातील नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडले असून, परिणामी वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात गावांच्या दिशेने धाव घेत आहेत. आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा दक्षिण वनपरिक्षेत्रात वनविभागाकडून कोणतीही पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. यामुळे तहानलेल्या वाघ, अस्वल, रोही, वानर आदी प्राणी पाण्यासाठी गावातील विहिरी, तलाव आणि शेतांच्या दिशेने येत असून, त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांचे जीवघेणे संकट - शेतीचे मोठे नुकसान

मागील काही दिवसाअगोदर सावळी सदोबा दक्षिण वनक्षेत्रातील माळेगाव, पाळोदी,जलांधरी,उमरी, कोपेश्वर या गावांमध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. तहान भागवण्यासाठी जंगलातून बाहेर पडलेल्या प्राण्यांमुळे शेतकरी आणि शेतमजूर संकटात सापडले आहेत. अनेक वेळा वाघ व अस्वल यांच्या हल्ल्यामुळे जीवितहानीच्या घटना देखील घडल्या आहेत. शिवाय, या वन्यप्राण्यांच्या संचारामुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. ऊस, गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी पिके प्राण्यांच्या आक्रमणामुळे उद्धवस्त होत असून, शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. वनविभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

वनविभागाचे दुर्लक्ष - वन्यप्रेमी आणि शेतकऱ्यांकडून तीव्र संताप

वन्यप्राण्यांना जंगलातच पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास, त्यांचा गावांकडे होणारा प्रवास थांबू शकतो आणि मानवी-प्राणी संघर्ष टाळता येऊ शकतो. मात्र, वनविभागाने अद्यापही कोणतेही ठोस पावले उचलली नाहीत. परिणामी, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

वन्यप्राण्यांचे संरक्षण आणि मानवी जीविताच्या सुरक्षेसाठी वनविभागाने तातडीने पुढाकार घेऊन जंगलामध्ये कृत्रिम पाणवठे उभारावेत, अशी मागणी वन्यप्रेमी आणि पर्यावरण कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. जर प्रशासनाने लवकर निर्णय घेतला नाही, तर पुढील काळात या भागातील परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते.

सरकार व प्रशासनाने गंभीरपणे लक्ष द्यावे

मानवी आणि वन्यजीवन यांच्यातील संघर्ष रोखण्यासाठी जंगलामध्ये कायमस्वरूपी पाणवठे निर्माण करणे आवश्यक आहे. वनविभाग, स्थानिक प्रशासन आणि पर्यावरणप्रेमी यांच्यात समन्वय साधून या समस्येवर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी नागरिक आणि शेतकरी करत आहेत. अन्यथा, येत्या काळात या भागात मोठा पर्यावरणीय आणि मानवी संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

पार्वती नगरात शिवजयंती साजरी; श्री रामकृष्ण परमहंस बहु. शिक्षण संस्थेचे तर्फे महाप्रसादाचे आयोजन



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : रविवारी १६ मार्च रोजी शिवजयंती निमित्ताने पार्वतीनगर येथे श्री रामकृष्ण परमहंस बहु. शिक्षण संस्था नागपुर तर्फे महाप्रसाद ठेवण्यात आलेला होता. याप्रसंगी उपाध्यक्ष भाजपा, अनुसूचित जाती मोर्चा, नागपुर प्रवीण पाटील संस्थेचे अध्यक्ष मंगेश घाखरे, नरेश चव्हाण, कु.चेताली वानखेडे, जयंत ईटनकर, अरविंद दुपारे, राजेश शेळके, समिर पालकर, या सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**